मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ११५ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०१८

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***

***माझा सस्नेह नमस्कार.***

वैशाखमासी प्रतिवर्षी येती, आकाश मार्गी नव मेघ पंक्ती।।
नेमेचि येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा।।

निसर्ग हा माणसाचा सर्वात मोठा गुरू आहे. मानवाला आवश्यक असे पाऊसपाणी किंवा अन्य गोष्टी देणारी सृष्टी म्हणजे निसर्ग, याच्या नियमितपणाचे मनोमन कौतुक करून त्याच्याशी सर्वांनी कृतज्ञ राहावे. मंडळी वरूणदेवाने कृपा केली आणि पाऊसाने छान वर्षाव केला. शेतकरी प्रसन्न झाले. पाणीटंचाईचे संकट कमी झाले. धरणीमातेने हिरवा शालू परिधान केला. चैतन्याचे, उत्साहाचे, मांगल्याचे प्रतिकच जणू असा श्रावणमास सुरू आहे. व्रत-वैकल्ये-पूजाअर्चा-उपास, गोडधोडाचे जेवण, यात हा पवित्र श्रावणमास कधी संपतो ते समजत नाही. मग गणपतीबाप्पाच्या आगमनाचे वेध लागतात. आपली मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभाही याच दिवसात असते. रविवार दि. ९ सप्टेंबर २०१८ ला सकाळी १० वा. स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. गुणवत्ता पारितोषिके प्रदान करण्याचा कार्यक्रम ही आपण त्याचवेळी करतो. श्री. अजित मराठे यांनी ठेव म्हणून दिलेल्या रकमेच्या व्याजातून आपण उद्योजकता पुरस्कार देतो. श्री. विनय मराठे, ठाणे यांना यावर्षी उद्योजकता पुरस्कार देऊन सन्मानित करणार आहोत. तेव्हा सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे. असो.

मंडळी, या अंकात श्री. वि.म. मराठे यांची विनोदी कथा 'वन्समोअर', सौ. विद्युल्लता मराठे यांची 'आमची शृंगेरी यात्रा' हा लेख, निवृत्त तुरुंगाधिकारी श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचा बंदी - नाथाभाऊ साईनाथ हा लेख, सौ. साधना मराठे यांचा 'सखी शेजारिणी'चा अनुभव, श्री. गोविंद ना. मराठे यांची अमावस्येची भीषण रात्र हा लेख इ. साहित्याचा समावेश आहे. श्री. उदय मराठे यांनी आपल्या तीर्थरूपांना वाहिलेली श्रद्धांजली भावपूर्ण आहे. वडिलांच्या प्रती असलेले प्रेम, जिव्हाळा, आत्मियता आणि आदर त्यांच्या लेखांतील शब्दाशब्दातून व्यक्त होताना दिसतो आहे. कै. श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे हे पोहणारे वीर होते. मराठे प्रतिष्ठानवर त्यांचा लोभ होता. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांना त्यांची उपस्थिती आवर्जून असेच. वृद्धत्वाचे वय असूनही त्यांचा उत्साह तरूणांना लाजविणारा असे. यथाशक्ती ते प्रतिष्ठानला देणगी देऊन आर्थिक मदतही करीत. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांना आता ते दिसणार नाहीत याचे वाईट वाटते. पोहोण्याच्या स्पर्धांमध्ये सुवर्णपदके ते पटकावयाचे त्याचे सविस्तर वृत्त 'हितगुज'मध्ये छापून

> **वार्षिक सर्वसाधारण सभा**
>
> रविवार दि. 9 सप्टेंबर 2018, सकाळी 9:30 वा.
>
> **-: सभास्थळ :-**
>
> मादाम कामा सभागृह, स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक, 252, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई 400 028
> (दूरध्वनी: 022 - 2446 5877)

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

आल्यावर त्यांना समाधान व्हायचे तसे ते बोलून दाखवायचे. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली. असो.

'थोरली एकादशी' हा श्री. नंदकुमार मराठे यांचा लेख अभ्यासपूर्ण आणि माहितीपूर्ण आहे. एकादशीची अशी कथा आहे की, मृदूमान्य नावाच्या राक्षसाने भगवंत शंकराकडे जाऊन त्यांची मोठ्या भक्तीभावाने कठोर साधना करून आराधना केली. शिवशंकर प्रसन्न होऊन त्यांनी, 'तू कोणाकडूनही मरणार नाहीस, पण एका स्त्रीच्या हातून तुला मृत्यू येईल', असा वर दिला. त्यामुळे मृदूमान्य अधिकच उन्मत झाला. त्याने देवगणांवर स्वारी करून सर्व देवांचा पराभव केला. तेव्हा सर्व देव शंकराकडे आले, पण शंकरानेच त्याला वर दिल्यामुळे त्यांना त्याच्याविरूद्ध काही करता येत नव्हते. मग सर्व देव शंकरासह एका गुहेत जाऊन बसले. तिथे त्या सर्वांच्या श्वासातून एक देवता निर्माण झाली. तिचे नाव एकादशी.

एकादशी या देवतेने मृदूमान्य राक्षसाला ठार मारले. त्यादिवशी पाऊस पडत होता. त्यामुळे सर्व देवांना स्नान घडले, तसेच सर्वजण गुहेत लपून बसल्यामुळे त्यांना उपवासही घडला. त्या दिवसापासून एकादशीचे व्रत म्हणून उपवास करण्याचा प्रघात पडला.

संपूर्ण गीता पाठांतर स्पर्धेत, शृंगेरी येथील श्रीमत्‌शंकराचार्यांच्या हस्ते सौ. विद्युल्लता आणि निवृत्त न्यायाधीश श्री. अरुणराव मराठे या उभयतांनी अठरा हजार व पंधरा हजाराची बक्षिसे मिळविली. या गीता पाठांतर परीक्षेतील यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानद्वारा या पती-पत्नींचा अभिमान वाटतो. कौतुक वाटले. श्री. मोरेश्वर ल. मराठे, सांगली यांच्या अमृतमहोत्सवासाठी त्यांचे अभिष्टचिंतन. असो.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. १६ ऑगस्ट २०१८)



**श्रीसाईबाबांच्या शिर्डी येथील समाधीला दिडशे वर्ष पूर्ण झाली. श्रीसाईबाबांना नमस्कार करून त्यानिमित्ताने श्रीसाईबाबांची अकरा वचने देत आहे.**

**शिर्डीस ज्याचे लागतील पाय।**
**टळती अपाय सर्व त्याचे ।।१।।**
**माझ्या समाधीची पायरी चढेल।**
**दुःख हे हरेल सर्व त्याचे ।।२।।**
**जरी हे शरीर गेलो मी टाकून।**
**तरी मी धावेन भक्तासाठी ।।३।।**
**नवसास माझी पावेल समाधी।**
**धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ।।४।।**
**नित्य मी जिवंत जाणा हेंची सत्य।**
**नित्य घ्या प्रचित अनुभवे ।।५।।**
**शरण मज आला आणि वाया गेला।**
**दाखवा दाखवा ऐसा कोणी ।।६।।**
**जो जो मज भजे जैसा जैसा भावे।**
**तैसा तैसा पावे मीहि त्यासी ।।७।।**
**तुमचा मी भार वाहीन सर्वथा।**
**नव्हे हें अन्यथा वचन माझे ।।८।।**
**जाणा येथे आहे सहाय्य सर्वास।**
**मागे जे जे त्यास ते ते लाभे ।।९।।**
**माझा जो जाहला काया वाचा मनी।**
**तयाचा मी ऋणी सर्वकाल ।।१०।।**
**साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य।**
**झाला जो अनन्य माझ्या पायी ।।११।।**

**।। श्रीसाईबाबा की जय ।।**

# संवाद कुलबांधवांशी

• हेमंत अरुण मराठे, (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी - ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

नमस्कार,

जून २०१८ च्या 'हितगुज'मध्ये आपल्याशी संवाद झाल्यानंतर गेल्या दोन-तीन महिन्यात बऱ्याच चांगल्या-वाईट घटना कुटुंबात तसेच देशभरात घडल्या. त्याचा आढावा घेऊच पण त्याचबरोबर इतरही गोष्टींचा उहापोह होईल.

मागचा अंक आपल्या हाती आला व सोबत पाऊसही सुरू झाला. यंदा देशभरात चांगला पाऊस पडेल असा हवामान खात्याने अंदाज वर्तवला होता व तो खरा ठरवत पावसाने छान सुरुवात केली. मात्र नेहमीप्रमाणे अधून मधून सुस्ती न दाखवता, कमी अधिक प्रमाणात, काही अपवाद वगळता, सर्व दूर चांगला पाऊस पडत आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी झाली, लोकांचे नुकसान झाले. मात्र एक लक्षणीय गोष्ट आढळली ती म्हणजे बऱ्याच ठिकाणी नियोजन न करता बांधकामे झाली असल्याने पाणी भरण्याचे प्रमाण वाढले.

आषाढ वारी उत्साहाने पार पडली. मात्र राज्याचे मुख्यमंत्री पंढरपूर येथील पूजेला जाऊ शकले नाहीत, म्हणजे जाऊ दिले नाही. हे काही चांगले झाले नाही. जातीजाती मधे जी तेढ निर्माण केली जात आहे ती राज्याला तसेच देशाला लांच्छनास्पद आहे.

आता श्रावण सुरू झाला असून आपल्या सर्वांच्या घरी विविध व्रतवैकल्ये सुरू झाली असतील. येणारे सणही साजरे होत राहणार. मागोमाग गणेशोत्सव येत आहे. येणाऱ्या सणासुदींसाठी आपणा सर्वांना खूप खूप शुभेच्छा. आपण आपल्या घरात छान छान सजावट करा. प्रतिष्ठान आयोजित घरगुती गणपती सजावट स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व याचा आनंद घ्यावा ही विनंती.

मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ९ सप्टेंबर २०१८ रोजी मादाम कामा सभागृह, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, २५२, वीर सावरकर मार्ग, उद्यान गणेश मंदिरासमोर, शिवाजी पार्क दादर मुंबई ४०० ०२८ येथे आयोजित केली आहे. सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ही विनंती.

आपले कुलबांधव 'निर्माण ग्रुप'चे संचालक श्री. अजित मराठे यांनी प्रायोजित केलेला उद्योजक पुरस्कार यावर्षी ठाणे येथील मराठे इन्फोटेक कंपनीचे श्री. विनय मराठे यांना देण्यात येणार आहे. आत्तापर्यंतचा हा तिसरा पुरस्कार आहे. म.प्र.च्या ९ सप्टेंबर २०१८ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हा पुरस्कार दिला जाणार असून, आपण सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

आपण पहातोय कि पूर्ण देशभर कचऱ्याच्या समस्येने रौद्ररूप धारण केले असून याला बरेचसे जबाबदार आपण स्वतःच आहोत. सरकारने प्लास्टिक बंदी केली व लोकांनी आरडाओरड सुरू केली, मात्र स्वतःमध्ये बदल करायला कोणी तयार नाही. खरंतर मुळ समस्या प्लास्टिक नसून लोकांना लागलेली सवय आहे. लोक ओला कचरा प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरून टाकतात ही खरी समस्या आहे. सुका व ओला कचरा जर प्रत्येक घरामध्ये वेगळा करून सुका कचरा पुनःनिर्माणासाठी पाठवला गेला तर ही समस्या बहुतांशी नाहीशी होईल. यालाच अनुसरून आपले पुण्यातील कुलबांधव डॉ. राहुल मराठे यांनी पातळ प्लास्टिक खाणाऱ्या अळ्यांविषयी मोलाचे संशोधन केले आहे. वर्तमानपत्रात याची माहिती प्रकाशित झाली व त्यांचे सर्वत्र कौतुक केले गेले. शेतकऱ्यांना उपयुक्त अशा कीटक, जिवाणूंविषयी संशोधन व त्या आधारित तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे हा त्यांचा व्यवसाय. 'मित्रकिडा' या त्यांच्या संकेतस्थळावर याविषयी माहिती आपल्याला मिळू शकेल. आपण 'मराठे प्रतिष्ठान'च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्यांचा सत्कार करणार आहोत, तसेच ते अर्धा तास याच विषयावर ध्वनीप्रकाश माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधणार आहोत.

मंडळी, आपला मराठे परिवार खूप मोठा आहे व प्रतिवर्षी आपले विद्यार्थी-विद्यार्थिनी वेगवेगळ्या परीक्षांमध्ये यश मिळवत असतात तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवित असतात. आपण आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्यांचा गौरव करत असतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून असं निदर्शनास येत आहे की बरेच पालक किंवा मुले आपले यश कळवत नाहीत. काय आहे की आपण त्यांचं कौतुक करतो कारण ते परिवाराने केलेले कौतुक असतं, व त्याचं मोल काही वेगळच असतं. तेव्हा आमची अशी विनंती आहे की आपण न चुकता आपल्या पाल्यांचे यश आम्हाला कळवा व समारंभाला पाल्यांसह आवर्जून उपस्थित रहा. दर वर्षीप्रमाणे याही वर्षी अशा पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत गौरविण्यात येणार आहे.

'मराठे प्रतिष्ठान'चे माजी कार्यवाह व महाराष्ट्रातील साखर उद्योगाशी बराच काळ निगडीत असलेले श्री. मोहन मराठे यांना

'Deccan Sugar Technologists Association'तर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

न्यायवैद्यक शास्त्रातील (Forensic Medicine) पहिल्या महिला डॉक्टर डॉ. श्रीमती वसुधा आपटे यांना 'World Records Foundation'तर्फे २०१५चा 'Noble Asian of the Year २०१८' हा पुरस्कार स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट २०१८ रोजी प्रदान करण्यात आला. डॉ. वसुधा या प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या भगिनी आहेत.

'मराठे प्रतिष्ठान'चे सभासद, सहकार क्षेत्रात 'सहकार भारती' या संस्थेद्वारे मोठं योगदान असलेले, श्री. सतिश मराठे यांची रिझर्व बँकेच्या कार्यकारी मंडळावर नेमणूक झाली, हे आपल्या परिवाराला अभिमानास्पद आहे. या चारही मान्यवरांचा गौरव या वार्षिक सर्वसाधारण सभे दरम्यान केला जाणार आहे.

या तिमाहीतील काही दुःखद घटना म्हणजे मुलुंड, मुंबई येथील जेष्ठ कुलबांधव, ज्यांची ओळख आपणाला जलतरणपटू म्हणून आहे, असे आपले सर्वांचे लाडके श्री. दत्तात्रय आत्माराम मराठे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. तसेच आपल्या 'हितगुज'चे भूतपूर्व संपादक कै. लक्ष्मण शं. मराठे यांच्या पत्नी उर्मिला मराठे यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. मराठे परिवार त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

आपण 'हितगुज'मधील लिखाणावर प्रतिक्रिया आवर्जून पाठवा. प्रतिक्रियाही 'हितगुज'मध्ये छापल्या जातात. आपणां सर्वांना येणाऱ्या गणेशोत्सवाच्या खूप खूप शुभेच्छा. आता भेट पुढील अंकामधे.

**– हेमंत मराठे**
कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०१८

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस न तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@maratrhepratishthan.org या इमेल आयडी वर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाईलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. 13 सप्टेंबर 2018 ते दि. 28 सप्टेंबर 2018.
- छायाचित्राच्या caption मध्ये प्रेषकाचे नाव किंवा शहर यांचा उल्लेख नसावा. प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डींग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

| या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके: | | |
|---|---|---|
| **प्रथम पारितोषिक : रु.1001/-** | **द्वितीय पारितोषिक : रु. 751/-** | **तृतीय पारितोषिक : रु. 501/-** |
| **20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.** | | |

**टीप:** १. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.

३. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा. ई-मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

# वन्स मोअर

• श्री. वि.म. मराठे (पृ. २३५), सांगली भ्रमणध्वनी – ९४२०६७८९६५

''मध्या लेका, तुला मांजराचा आवाजा काढायला सांगितला होता. पण तू कसला आवाज काढलास? तुझा आवाज ऐकून ते मांजर घाबरून गेले असेल व आणखी आतल्या कपारीत जाऊन बसले असेल.'' अपार्टमेंटचे सेक्रेटरी देशपांडे यानी असे सुनावले तेव्हा मधूने मान खाली घातली. ''मला मांजराचा आवाज काढता येत नाही असे मी अगोदरच सांगितले होते. पण तुम्ही सर्वानी मला जसा येईल तसा काढ असे सांगितलेत म्हणून मी प्रयत्न केला. तुमच्या सर्वांच्या प्रयत्नात माझी फूल ना फुलाची पाकळी असावी एवढीच माझी इच्छा होती. पण तुम्हाला ती पसंत पडली नाही. ठीक आहे.'' एवढे म्हणून मधू कोपऱ्यात जाऊन उभा राहिला.



नवीन वसाहत झालेल्या गणेश कॉलनीत मोहिनी अपार्टमेंट मध्ये आज सकाळ पासूनच गडबड उडाली होती. अपार्टमेंटच्या मागील कोपऱ्यातून गेले रात्रभर मॅव, मँव असा मांजराचा केविलवाणा आवाज ऐकू येत होता... रात्रीच्या शांततेत त्या आवाजाने सर्वांची झोपमोड झाली होती. पण रात्र असल्याने कोणी तिकडे जाऊ शकत नव्हते. तरी पण आपल्या हक्काविषयी जागरूक असणाऱ्या काहींनी रात्री फोन वरून ''अहो देशपांडे, मांजराचा आवाज ऐकू येतो का? काही करणार आहात का? की आमची झोपमोड अशीच चालू राहणार आहे?'' असे देशपांडे यांना सुनावले होते. देशपांडे सोसायटीचे सेक्रेटरी असल्याने ते त्यांचीच जबाबदारी असे सर्वजण समजून होते.

मांजराचा आवाज जसा सर्वाना ऐकू येत होता तसा तो देशपांडेनाही ऐकू येत होता. पण रात्र असल्यामुळे ते काही करू शकत नव्हते सर्व सोसायट्यांमध्ये असते तसे या सोसायटीतही काहीजण सेक्रेटरीच्या बाजून व काही त्याच्या विरूद्ध होते. आपल्या बाजूने असलेल्या काही सभासदाना रात्री बोलावून देशपांडेनी सल्लामसलत केली होती. व मांजराचा आवाज ऐकू येतोय ते मांजर विहीरीतच पडले आहे का ते बघायचे व तसे पडले असेल तर काय करायचे याची कच्ची योजना तयार केली होती. पण हे सगळे करण्यासाठी सकाळ होण्याची वाट बघणे जरूर होते. बराच वेळ जागरण झाल्यामुळे देशपांडे यांना पहाटे झोप लागली. सकाळी त्यांच्या दारा बाहेर गलका ऐकू आला त्यामुळे ते जागे झाले. तोच ''अहो सेक्रेटरीसाहेब उठला की नाही'' असा आवाज ऐकू आला. व त्या बरोबरच दारावरच्या बेलचा कर्कश्श आवाजही ऐकू आला. एकदा तोंडाने ओरडल्यावर परत बेल दाबण्याची काही जरूर नव्हती पण काहींचा स्वभावच इतका उतावीळ असतो की त्याना कोणत्याही गोष्टीत दम धरवत नाही. बाहेर जमलेल्यांमध्ये काही शेजाऱ्यांबरोबर काही बायका, मुलीही होत्या, सर्वजण आता देशपांडे यांचेबरोबर विहिरीवर जाऊन मांजर बाहेर काढण्याच्या मोहिमेत सामील होणार होते. काही जणी ''अहो काका, ते मांजर बाहेर काढायचेच बरंका. रात्रभर मेल्याने सर्वांना जागविले आहे. आज रविवार होता चांगले आरामात उठण्याचा विचार होता.'' असे म्हणत होत्या तर काही जण ''जरा सर्वजण गप्प बसा. काय करायचे आहे त्याचा विचार करायला त्याना वेळ मिळू दे. त्यांचेवर ही पहिलीच वेळ आहे,'' असे म्हणून जरा त्यांना सावरून घेत होते.

''अहो, त्यांची ही पहिलीच वेळ आहे हे आम्हाला मान्य आहे. पण सेक्रेटरी म्हणून काही जबाबदारी आहे की नाही? रात्रभर ते मांजराचे ओरडणे ऐकू येत होते त्यानी निदान तिकडे जाऊन बघितले तरी आहे का हे त्याना विचारा. बघितले असेल तर उपाय सापडेल ना! घरात बसून कसा काय उपाय सापडणार?

प्रत्येक जण देशपांडे याना बोलून न देता आपसांत चर्चा करीत होते. त्या सर्वांना हॉलमध्ये बसवून देशपांडे आंघोळ वगैरे करून आले. ते तेथून कधी सटकले होते ते कुणालाच कळले नव्हते.

हॉलमध्ये येताच देशपांडे यानी जरा मोठ्या आवाजात सर्वांना गप्प बसण्यास सांगितले व आता संभाषणात भाग घेऊन सांगू लागले ''तुम्हाला जसा मांजराच्या ओरडण्याचा त्रास झाला तसा मलाही झाला. देशपांडे यांचे पुढील वाक्य पुरे होण्या अगोदरच''

अहो झाला काय म्हणताय, होतोय म्हणा. अजूनी ओरडणे चालूच आहे ना?'' ऐका शेजारणीने मध्येच आवाज काढला. त्यांच्याकडे जरा रागानेच कटाक्ष टाकत देशपांडे यानी आपले भाषण पुढे सुरू केले. ''बरं होतोय म्हणा, तसा मलाही होतोय. मी काही बहिरा नाही. ते मांजर विहीरीत पडले असेल तर ते बाहेर काढण्याची जबाबदारी माझी एकट्याची नाही. तुम्हाला माहितच आहे की त्या विहीरीभोवती बरेच गवत वाढलेले आहे. त्यामुळे रात्री मी तिकडे जाऊ शकलो नाही. आता तुम्ही सर्वांनी मदत केली तर ते काम लवकर होईल. आपण आता सर्वजण तिकडे जाऊ आणि पुढील प्रयत्न काय करायचे ते ठरवू.''

एवढे सर्व झाल्यावर सर्वजण विहिरीकडे जाण्यास निघाले. तिकडे जाताजाता एकमेकात ''कसे पडले असेल हो! काल पासून उपाशी आहे बिचारे, आता लवकर बाहेर काढले नाही तर त्याचा आवाज मंद मंद होत जाईल व शेवटी बंद होईल. असे कोणीतरी म्हणताच अहो, जरा सिरीयस व्हा! मंद मंद, बंद बंद, असे अनुप्रास जमवून विनोद करण्याची ही वेळ आहे का? आता जरा गप्प बसा व आत डोकावून बघा. सर्वानी आत डोकावून बघितले मांजराचा आवाज ऐकू येत होता पण दर्शन होत नव्हते. ते कोठे तरी कपारीत लपले होते. ते बाहेर काढण्यासाठी कोणीतरी मांजराचा आवाज काढायचा ही कल्पना लढविली गेली होती व मधूला तो नाही म्हणत असताना जसा येईल तसा तू मांजराचा आवाज काढ असे सांगितले गेले होते. पण मधूला ते जमले नाही व ती कल्पना फेल गेली...

''हे बघा देशपांडे मधूला आवाज काढता आला नाही हे खरे आहे. पण ते मांजर बोका आहे की मांजरी हे आपणाला माहीत नाही. दोघांचे आवाज वेगळे असतात. त्यामुळे कोणत्या आवाजाला प्रतिसाद मिळेल ते सांगता येत नाही. मांजरी असेल तर बोक्याच्या आवाजाला प्रतिसाद देण्यासाठी बाहेर येईल आणि ''व्हाईस व्हर्सा'' कोणीतरी वाक्य पुरे केले आणि सर्वानी क्षणभर हसण्याचा आनंद घेतला व परत सर्वजण विहीरीत डोकावून बघू लागले. हे बघा मी सांगतो पटते का बघा असे म्हणून अपार्टमेंटचे गणेश उत्सवाचे सेक्रेटरी सांगू लागले, ''मागच्या वर्षी आपल्या गणेश उत्सवात आपण नकलांचा कार्यक्रम केला होता तो कोष्टी आठवतोय का? त्याने निरनिराळ्या प्राण्यांचे आवाज अगदी हुबेहूब काढले होते, त्याला बोलावू. म्हणजे तो दोन्ही आवाज काढेल. ''नकलाकार कोष्टीला मांजराचे आवाज काढण्यासाठी बोलाविण्याची कल्पना सर्वांना पसंत पडली व त्याला बोलाविण्याचे ठरले. कोष्टीला बोलावताय, पण त्याचे मानधन किती असते याची कल्पना आहे का? नीट विचार करून बोलवा नाहीतर मांजर बाहेर काढणे महागात पडायचं एकाने शंका काढलीच.

''महाग पडायचं म्हणे, मग काय करायचं ते सांगा. स्वतः काही करायचे नाही पण चालू कामात खिळ घालयच बरं जमतं तुम्हाला''. दुसरा आवाज...अरे बाबानो, गप्प बसा. आधी तो कोष्टी सापडतोय का बघा. मग पुढचा प्रश्न. ''अशी प्रश्नोत्तरे चालू झाली. आणि थोड्याच वेळात कोष्टीच्या विषयावर पडदा पडला कोष्टी गावात नव्हता तेवढ्यात विहीरीतून मँव मँव असा आवाज आला. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. आता त्याला बाहेर काढायची तयारी सुरू करण्यास हरकत नव्हती.

विहिरीतून मांजर कसे बाहेर काढायचे हे काही कोणी कुणाला शिकवायची जरूरी नव्हती. एक दोरी घ्यायची, एक बादली घ्यायची दोरी बादलीला बांधायची व मांजर जेथे बसले आहे तेथे सोडायची! प्रश्न होता तो सोडलेल्या बादलीत मांजर येण्याचा. पण प्रयत्न करणे भाग होते, देशपांडेनी बादलीला दोरी बांधणे सुरू केले. त्यानी दोरी बांधली व हाताने ओढून गाठ घट्ट बसली की नाही ते बघत असतानाच जोशी वहिनीनी सूचना केली ''काका, गाठ घट्ट मारा बर कां? व आत सोडताना पण काळजी घ्या. नाहीतर समोरच्या बाजूवर आपटून बादली फुटेल.''

''अहो जोशी वहिनी, काकाना तेवढं समजत बरं कां. तेवढं सांगायला नको.'' काळे वहिनीनी उगीचच मध्ये तोंड घातले.

''सांगायला नको म्हणजे काय? माझी बादली आहे म्हणून सांगितले. अगोदरच सांगितलेले बरे! नंतर सांगून काय उपयोग? आणि शेवटी बादली आमचीच उपयोगी पडली ना? इतरांच्या कडे काय बादल्या नव्हत्या का? पण अशा वेळी कोणी देत नाही. मग काय काकाना आम्हीच दिसतो. हो की नाही हो पाटील वहिनी?'' जोशी वहिनीनी पाटील बाईना विचारले. दोरी पाटील बाईंची होती त्यामुळे त्या हो म्हणणार याची त्याना खात्री होती.

''हो ना! दोरी शेवटी आम्हीच दिली ना? मागायला आल्यावर काय नाही म्हणता येतय थोडच! दोरीवर ओले कपडे होते ते काढून ठेवले व दोरी दिली... आता नीट परत येऊ दे म्हणजे मिळवली!'' पाटील बाईनी जोशीबाईना सपोर्ट देताना आपली बाजू मांडली.

''तुमच्या दोरीला काही होणार नाही हो. त्या मरतकुड्या मांजराचे वजन ते काय असणार! मांजर पाळायचे म्हणजे त्याला खायला घालावे लागते. ते तर कोण करत नाही पण आपले मांजर आहे हे दाखविण्यासाठी गळ्यांत बांगडी मात्र अडकवून ठेवतात.''

''अहो वहिनी गळ्यात बांगडी अडकवितात ती दुसऱ्या मांजराने गळा पकडू नये म्हणून'' असे म्हणत मधूने तोंड घातले

व सहज चाळा म्हणून हातातला खडा मांजराच्या दिशेने विहीरीत भिरकावला थोडेच चुकले नाहीतर दगड मांजराला लागला असता. तेवढ्याने मांजर मात्र घाबरले व त्याने जोरात मँव मँव असा आवाज काढला.

या सर्वांची आपसांत बडबड चालू होती पण त्याकडे लक्ष न देता देशपांडे यानी बादलीला दोरी बांधण्याचे काम पुर्ण केले होतो व आता ते बादली आत सोडण्यास तयार झाले होते. त्यानी बादली सोडायची पोज घेतली आणि सर्वांच्या गणपती बाप्पा मोरया या आवाजांत ती आंत फेकली. पण दोरी पुरती सोडली गेली नव्हती त्यामुळे ती मध्ये लटकून भिंतीवर आपटली. परत वर घेऊन पूर्ण दोरी हातात घेऊन बादली आत फेकली. आता मात्र ती बरोबर मांजराच्या जवळ पडली. पण ते घाबरून बाजूला गेले. त्यानी बादलीत यावे म्हणून काहीनी शुक शुक असा आवाज काढला. काहीनी पिस पिस असा आवाज काढला पण ते बादलीत येईना. बराच वेळ दोरीची हालचाल करून प्रत्येकजण दमून गेला होता. आता शेवटचा उपाय म्हणून बादलीत काही तरी खाण्याचा पदार्थ ठेवल्यास तो खाण्यासाठी ते बादलीत येईल असा उपाय सुचल्यावर एकदा दूध एकदा लोणी एकदा दूध भात असे निरनिराळे उपाय करून बघितले पण मांजर बादलीत येईना. सर्वजण कंटाळले होते.

आत डोकावून बघून बघून सर्वांच्या माना अवघडल्या होत्या. बारा वाजून गेले होते. सर्वाना भूक लागली होती. तेव्हा आता शेवटचा उपाय म्हणून लोणी लावून ब्रेडचा तुकडा बादलीत ठेवायचा व पाळी पाळीने एकाने तेथे थांबायचे व मांजर बादलीत आले की बादली वर ओढायची असा निर्णय घेऊन एक ब्रेडचा तुकडा लोणी लावून बादलीत ठेवला व बादली आत सोडली. दोघेजण तेथे थांबून बाकीचे निघण्याच्या तयारीत होते तेवढ्यात मांजराने झेप घेऊन बादलीत प्रवेश केला. सर्वानी सुटकेचा निश्वास सोडला. सकाळपासूनच्या प्रयत्नाला आता यश येणार होते. दोरी वर ओढून घेतली. बादली विहीरीबाहेर काढताच मांजराने बाहेर उडी घेऊन धूम ठोकली. आता दोरी सोडून बादली मोकळी करण्याचे काम सुरू झाले. बादली मोकळी झाली विहिरीतून पुन्हा मँव मँव असा आवाज ऐकू आला. सर्वानी आत डोकावून बघितले.

आणखी एक मांजर त्याला वर घेण्यासाठी केविलवाण्या नजरेने वर बघत होते. व बादलीची सोडलेली गाठ परत बांधण्यासाठी देशपांडे तयारी करत होते. त्यांच्या कामाला 'वन्समोअर' मिळाला होता.

*(बूमरँग कथा संग्रहातून)*

# वाचकांचा पत्रव्यवहार

प्रति,
**डॉ. सौ. सुमेधा मराठे**
संपादिका 'हितगुज' मुंबई
स.न.

नियमितपणे प्रसिद्ध होणारे 'हितगुज' १ जून रोजीच मिळाले. अंक वेळेवर संपादन करणे व पुढील सर्व गोष्टी करणे हे बरेच कष्टाचे असते. अशा या वक्तशीरपणाबद्दल सर्व संबंधितांचे अभिनंदन!

अंकातील आपले दोन्ही लेख तसेच सौ. साधना मराठे यांनी 'खिडकी'वर लिहिलेला लेख आवडला. तसेच इतरही लेख आवडले. श्री. रमाकांत विद्वांस यानी आपल्या दिवंगत पत्नीच्या तसेच आई वडीलांच्या स्मृतीप्रित्यर्थ देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मी १९५७ साली ओव्हरसिअर म्हणून नोकरीस लागलो व १९९२ मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवृत्त झालो. त्यानंतर कथा लिहू लागलो. दोन कथा संग्रहात २९ कथा प्रसिद्ध झाल्या. प्रकल्पाच्या ठिकाणी घडलेले विनोद, केवळ विनोद अशी लेखनाची सुरुवात केली तीची दोन कथा संग्रहापर्यंतची वाटचाल कशी झाली हे आठवत 'मी लेखक कसा झालो' हे लिहीले. माझी नात कु. पारीजात ही ८८% गुण मिळवून १२ वी कॉमर्स उत्तीर्ण झाली. प्रतिष्ठानच्या स्कॉलपशिपसाठी तिचा अर्ज स्वतंत्रपणे पाठवत आहे.

पत्र लिहून ठेवले पण पाठवणे मागे पडले त्याला कारण काही नाही.

श्री. प्रभाकर याना व सर्व कार्यकारी मंडळास नमस्कार.

आपला
**वि. म. मराठे** (पृ. २३५), सांगली

## सुविचार

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ
आओका रे तुम्ही भक्त भागवत, कराल ते हित सत्य करा
न घडो कोणाही जीवाचा मत्सर, वर्म सर्वेश्वर पूजनाचे
तुका म्हणे एका देहाचे अवयव, सुख-दुःख जीव भोग पावे।।

# संत मुक्ताबाई

• डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे (पृ. १२०), वडाळा दूरध्वनी – ०२२–२४१५०८८९

**हरीदासाच्या घरी । मज उपजवा जन्मान्तरी।।**
**म्हणसी काही मागा। हेची देगा पांडुरंगा।।**

### मुक्ताई सुंदर

मुक्ताईच्या ७२१ व्या पुण्यतिथीचे वर्ष सध्या सुरू आहे. शके १९०१ हे मुक्ताईच्या जन्मशताब्दिचे वर्ष होते. शके १२०१ म्हणजे इ.स. १२७९ मध्ये अश्विन शुद्ध प्रतिपदेस मध्यान्ह समयी आळंदी येथे विठ्ठलपंत व रूक्मिणी ह्या तपस्वी व वैराग्यसंपन्न मातापित्यांच्या पोटी मुक्ताबाईचा दिव्य जन्म झाला.

### मुक्ताबाई नमो त्रिभुवन पावनी



श्रीज्ञानदेवांची धाकटी बहीण श्रीमुक्ताबाई हा आदिशक्तीचा अर्थात देवीचा अत्यंत सात्विक असा अवतार होय. ''या देवी सर्वभूतेषु शान्तिरूपेण संस्थिता'' अशी सर्व प्राणीमात्रांमध्ये गुप्तपणे असणारी साध्वी शांती–दया–श्रद्धा सद्बुद्धी मुक्ताबाईच्या रूपाने मूर्तिमान झाली. पूर्वीच्या युगा–युगांत देवीने महिषासुर–चंडमुंड–शुंभनिशुभ इत्यादी असुरांच्या मर्दनासाठी जे अवतार घेतले त्या सर्व अवतारांत देवीने आपल्या असंख्य हातांत गदा–बाण–खड्गढाल–धनुष्य–त्रिशूल इ. विविध शस्त्रे धारण केली होती. मुक्ताबाईचा अवतार हा साधूंच्या वा संतांच्या स्वरूपातला अवतार आहे. दुष्टांचे हनन न होता त्यांची मुख्यतः दुष्ट बुद्धी नष्ट झाली पाहिजे असा संतांचा सतत प्रयत्न असतो. 'जे खळांची व्यकंटी सांडो' अशीच उत्कट इच्छा श्रीज्ञानदेवांनी आपल्या पसायदानात प्रकट केली आहे. श्रीज्ञानदेवांच्या संतकार्यात सुंदर सहकार्य करण्यासाठी आदिशक्तीने, ''पुढे चाले ज्ञानेश्वर मागे मुक्ताई सुंदर'' अशा संत स्वरूपांत दिव्य अवतार घेतला. या त्रिभुवन पावनी मुक्ताईचे चिंतन करणे म्हणजे आपण पावन होणेच होय.

### सांभाळी सोपान मजलागी

केवळ गुरुची आज्ञा म्हणून विठ्ठपंतानी संन्यासाश्रम सोडून पुन्हा गृहस्थाश्रमात पदार्पण केले. तेव्हा लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यांना वाळीत टाकले. अशा बहिष्कृत अवस्थेत ज्ञानदेवादी भावंडे जन्माला आली. अर्थात अगदी लहानपणी ह्या बहिष्कृत अवस्थेत ज्ञानदेवादिक बंधूंबरोबर मुक्ताबाईसही दुःख सहन करावे लागले. आळंदी येथे किंवा ज्ञानदेवांच्या पूर्वजांचे गाव आपेगाव येथे जेव्हा निवृत्ती–ज्ञानदेव कोरान्न भिक्षेसाठी बाहेर पडत तेव्हा ''सांभाळी सोपान मजलागी'' अशी कारूण्यमय अवस्था मुक्ताबाईनी बालपणाच्या पहिल्या पाच वर्षात अनुभविली.

### दर्पहरण लीला

मुक्ताबाईच्या चरित्राचा समावेश श्रीज्ञानदेवांच्याच महान चरित्रात होतो. तिच्या सर्व लीला 'दर्पहरण लीला' आहेत. तिच्या साधुत्वाने भरलेल्या व्यक्तिमत्त्वात स्पष्टवक्तेपणा – निर्भिडपणा हे गुण विशेषपणे चमकून दिसतात. नामदेव मोठे विठ्ठलाचे भक्त – संत शिरोमणी पण त्यांना थोडी अहंकाराची बाधा प्रथम झाली होती. पुढे संत सभेत श्रीगोरोबा कुंभारांनी आपल्या थापटण्याचा उपयोग करून सर्व संतांच्या संतत्वाची पारख केली. त्यावेळी थापटणे डोक्यावर बसताच नामदेव एकदम रागावले. ह्याप्रसंगी मुक्ताबाई म्हणाली, 'गोरोबा हा कच्चा आहे.'

मुक्ताबाई स्पष्टपणे नामदेवांना 'अखंड जयाला देवाचा शेजार। का रे अहंकार गेला नाही?

नंतर मुक्ताबाईंच्या तेजस्वी प्रेरणेने विसोबा खेचर नामदेवांना महान गुरु भेटले. गुरुकृपेमुळे नामदेवांचे जीवन भव्य–दिव्य झाले. ज्ञान, प्रेम आणि भक्ती–आनंद यांची अनुभूती आली आणि 'ज्ञानदीप लावू जगी' असे महत्कार्य नामदेवांनी केले. इतके की पंजाबपर्यंत भागवत धर्माचा ज्ञानदीप प्रज्वलीत केला. नामदेव मुक्ताईविषयी म्हणतात, 'लहानशी मुक्ताई। जैसी सणकांडी। केले देशोधडी। महान संत''

कारण मुक्ताबाई सडेतोड टीका करीत असे. हा स्पष्ट वक्तेपणाचा गुण नामदेवांनी अधोरेखित केला आहे.

### चांगदेव पासष्टी

त्याकाळी चांगदेव मोठे, माणसे जीवंत करणारे असे योगी होते. पण त्यांचे जीवन नीरस होते. अहंकाराने, दर्पाने भरलेले होते. 'हरली चांगयांची भ्रांती' मुक्ताईने दूर केली. चांगदेवाने ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहावा का आशीर्वाद हे न उमगल्याने कोरा कागद पाठविला तेव्हा 'हा तर अगदीच कोरा' आहे असा अभिप्राय मुक्ताबाईने दिला. ज्ञानदेवांनी चांगदेवांना ६५ ओव्यांचे एक बोधमय पत्र लिहिले. पण चांगदेवांना पत्राचा अर्थ कळत नव्हता. तेव्हा ज्ञानदेवांच्या आज्ञेनुसार मुक्ताबाईनी विश्रांती वटाखाली त्या पासष्ट ओव्यांचा आंतरिक अर्थ चांगदेवास

सांगितला आणि बोधसंपन्न केले. 'चांगदेवपासष्टी' हे त्या काव्याचे नाव आहे चौदाशे वर्षे वयाच्या चांगयाची मुक्ताबाई गुरू बनली. भक्तिज्ञान वैराग्याने भरलेला असा थोर अधिकार मुक्ताबाईचा होता. ती अखंड बोधस्थितीत वास करीत होती. चांगदेवाने त्याच्या अभंगात, 'मुक्ताई जीवन चांगण्या दिले' असा गुरुगौरव मुक्ताबाईचा केला आहे.

**काव्य रचना**

मुक्ताबाईचे अभंग थोडे असले तरी त्यात आत्मानुभवाचा जोर तिच्या वाणीत काव्यात भासतो. पंढरीमाहात्म्य, नाममाहात्म्य व संत समागम या विषयावर तिची अभंगरचना आहे. सगुण आणि निर्गुण या कल्पनांच्याही पलीकडे जाण्याचे सामर्थ्य मुक्ताबाईंच्या ठिकाणी आहे म्हणून 'निर्गुणाची सेज सगुणाची बाज। तेथे केशिराज पहुडले', अशी कल्पना त्या करतात. ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, पाठीवर मांडे भाजले या चमत्कारात मुक्ताबाई बरोबर होतीच. भावांच्या कार्यात ती समरस झाली होती. एकदा ज्ञानेश्वर रागावून, निराश होऊन ताटी लावून बसले असता त्यांना प्रेमाने, कळकळीने ती विनवणी करताना म्हणते, ''रागे भरावे कवणासी। आपण ब्रह्म सर्व देशी। ऐशी समदृष्टी करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।। योगी पावन मनाचा। साहे अपराध जनाचा।। विश्व जालिया वन्ही। संत सुखे व्हावे पाणी।'' हे 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत. यात मुक्ताईच्या भावनेची कोवळीक दिसते.

मुक्ताबाईस लहानपणीच खडखडीत आत्मज्ञान लाभले होते. आपला आध्यात्मिक अनुभव सांगणारा तिचा एक अभंग सुप्रसिद्ध आहे तो असा - मुंगी उडाली आकाशी। तिने गिळीले सूर्यासी।

थोर नवलाव झाला। वांझे पुत्र प्रसवला।

माशी वियाली घार झाली। देखोनि मुक्ताई हासली।।

तसेच ''एक तत्त्व धरी हरि - नाम गोड' असा नामप्रेमाचा उपदेश सकळ मानवी जीवांना त्या करतात. विकल्पाची किंवा प्रपंचाची निवृत्ती झाल्यावर ज्ञानप्राप्ती होण्यास उशीर लागत नाही व ज्ञानसोपान मार्गाने जाणारास मुक्ती दूर नाही हे मुक्ताबाईच्या जीवन चरित्राचे सार आहे.

**विद्युल्लता**

शके १२१८ कार्तिक वद्य १३ ला श्रीज्ञानदेवांनी आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. नंतर त्वरित एक महिन्याने सोपानाने सासवड येथे समाधी घेतली. माघमासात चांगदेवांनी समाधी घेतली. मुक्ताबाईंना अतिशय उदास वाटू लागले. संतांच्या समवेत यात्रा करीत मुक्ताबाई खानदेशांत एदलाबादजवळील मेहुण गावी आल्या. सद्गुरू श्रीनिवृत्तीनाथांनी त्यांना ब्रह्मबोधाची जाणीव दिली.

तेव्हा मुक्ताबाई म्हणाल्या ''सर्वत्र परमात्मस्वरूप भरले आहे. जायचे कोठे यायचे कोठे?'' आणि थोड्यांच क्षणांत आकाशात एकदम मेघगर्जना झाली. विजेचा प्रचंड कडकडाट झाला आणि मुक्ताबाई अदृश्य झाल्या. भगवतस्वरूपी लीन झाल्या तो दिवस वैशाख वद्य द्वादशी शके १२१९ हा होता. मुक्ताबाईंचे केवळ १८ वर्षे वय होते. साधुसंत दुःखित झाले. ''होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई। संत ठायी ठायी स्फुंदताती।'' एदलाबादेस मुक्ताबाईची समाधी आहे.

मुक्ताबाईंचे जीवन व वाङ्मय हे विद्युल्लतेप्रमाणे चमकून जाणारे तेजस्वी आहे. आदिशक्ती मुक्ताबाईचे चरणी हे वाक्पुष्प समर्पण. ♦

# पाककृती

## फ्रूट ॲण्ड नट सॅण्डविच



**साहित्य** :- ब्रेड स्लाइस, आवडीची फळे, फेटलेले क्रिम, मिक्स फ्रूट जॅम, काजू, बदाम आणि आक्रोडचे बारीक तुकडे, चॉकलेट सॉस

**कृती** :- फळांचा बारीक फोडी करून घेणे ब्रेडला जाम लावून त्यावर फळांच्या फोडी व ड्रायफ्रूटसचे तुकडे घालावेत. नंतर त्यावर फेटलेले स्वीट क्रीम घालावे. आवडत असल्यास चॉकलेट सॉस स्प्रेड करावा. नंतर त्यावर दुसरा ब्रेड स्लाइस ठेवावा.

फ्रूट ॲण्ड नट सॅण्डविच तयार.

## मटार पनीर पराठा



**साहित्य** :- १ वाटी मटार, १ वाटी पनीर, आले-लसूण मिरची पेस्ट, मीठ, गव्हाचे पीठ

**कृती** :- प्रथम गव्हाचे पीठ तेल घालून व मीठ घालून भिजविणे. नंतर मटार वाफवून घेऊन क्रश करून घेणे. त्यामध्ये पनीर किसून घालणे. बारीक केलेले मटार पनीर एकत्र करून त्यामध्ये आले, लसूण मिरची पेस्ट व मीठ घालावे. कणकेचे दोन गोळे करून मधोमध हे मिश्रण भरावे व पराठे लाटावेत. बटर किंवा तूप लावून भाजावेत. पुदिना चटणीबरोबर सर्व्ह करावेत.

**सौ. पल्लवी मनिष मराठे**, सांगली (९८८१३०२४८४)

# सखी शेजारणी

• सौ. साधना सुधाकर मराठे (पृ.५७), नागाव भ्रमणध्वनी – ९७६७६५३१३१

**ह्यां**च्या निवृत्तीनंतर आमच्या खेडेगावातील वडीलोपार्जित घरी राहायला आले. बरं का? येवून सुद्धा २४ ते २५ वर्ष सहज झाली असतील. खेडे गावातील घर म्हटलं की घराभोवती आवार अंगण आणि समुद्र किनारी राहत असल्यामुळे नारळ सुपारीची वाडी. आणि त्यात हक्काचं घर म्हणजे मनाला झालेला आनंद. सारं कसं शांत शांत आणि मनाचा उत्साह वाढवणारं वातावरण.

आमच्या ह्यांना की नाही गाण्याची खूप आवड. सकाळच्या वेळांत परिसरातील केरकचरा काढतांना आणि माडासुपारीच्या आळीत वळवळाने पाईपद्वारा पाणी सोडतांना ह्यांचा मधूर स्वर अगदी त्या सकाळच्या रम्य वेळी आसमंत भारून टाकतोय. अस मला सतत जाणवतं बघा. ह्यांच्या सुरेल स्वरांचं मला खूपच अप्रूप वाटतं.

खेडेगावातील घरं काही शहरातल्या घरांसारखी अगदी जवळजवळ नसतात. अगदी १५ ते २० फुटांचं तरी अंतर असतंच. त्यामुळे एकमेकांच्या घरात डोकावण्याचा अगाऊपणा इथं कोणाला करणं जमतंच नाही. हे इथलं अगदी मोठं सुख आहे. गावातील घडणाऱ्या बातम्या सुद्धा अगदी गाव गप्पातून कानावर येणार.

आमचे हे म्हणजे... इतकी वर्ष ह्यांच्याशी संसार करून सुद्धा त्यांच्या खऱ्या स्वभावाचा पत्ताच लागत नाही. तुम्ही म्हणाल सुद्धा काय बाई आहे. ५३ वर्ष संसार करूनसुद्धा त्याच्या अंतर्मनातील आपला आवाज हिला कळाला नाही. धन्य आहे गं बाई. पण अगदी खरं खरं सांगते. ह्यांचं बोलणं हळूवार मृदू, जणू काही भरपूर पाकांत मुरलेला गुलाबजामच. हसणं कसं अगदी स्मित हास्य, कधी गडगडाटी हसणं नाही. की खळाळून हासणं नाही. हे मात्र मला फारच खटकतं. खळखळून हासणं म्हणजे आपल्या चेहऱ्याच्या स्नायूंना फुकटात मिळणारं टॉनिक असतं. पण ह्यांच्या मनावर ही गोष्ट ठसविण्यांत मी अगदी सपशेल हारले. ५३ वर्षाच्या सहवासांत हे जमलं नाही.

त्या दिवशी बाई सकाळी गंमतच झाली. ह्यांचा ह्या वयातील एक चमत्कार पाहायला मिळाला. अहो, सकाळी सकाळी परिसर झाडतांना ह्यांचा असा काही सूर लागला की काही विचारूच नका. सखी शेजारिणी... तू हसत रहा, हसत रहा, हास्यात फुले गुंफीत रहा...

ही एक ओळ कमीतकमी ८ ते १० वेळा आळवत राहीले. मी बापडी स्वैपाकघरांत थंडीचे दिवस असल्यामुळे गॅसवर ह्यांचा घसा शेकण्यासाठी आलं घालून चहा उकळत होते. आणि स्वारीचं अगदी आळवून आळवून अगदी तल्लीन होवून गाण म्हणणं चाललं होतं.

मनात म्हटलं नेहमी अभंग म्हणण्यात तल्लीन होणारे ह्यांचे स्वर आज समुद्रावर आलेल्या भरतीच्या लाटेत विरून गेले वाटतं? हे असे गद्धे पंचविशीत किंवा तिशीत ओठावर आले असते तर समजू शकले असते. पण हे का वय राहिलं आहे. असलं काही म्हणायचं. पण म्हणतात नं? पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा. अशा त्या ठसकेबाज लावणीतल्या शब्दांची आठवण झाली. आणि मलाच बाई जोरांत ठसका लागला. जणू काही ब्याडगी मिरचीचा खकाणा घशांत जावा तसा.

मग वाडीतलं काम उरकून घरात शिरताच मी ह्यांना दारातच विचारलं ''काय हो आज देवाचे अभंग आठवलेच नाही का?'' त्यावर नेहमीच्या स्टाईलमधील ठेवणीतलं स्मितहास्य माझ्याकडे फेकीत चेहऱ्यावरच बावरलेले भाव लपविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत म्हणतात कसं ''अग कधी कधी ह्या वयात सुद्धा काही तरला भावुक भावना असतात, अगदी आमच्या ह्या वयातल्या पुरुषांना सुद्धा'' त्यावर मी मिस्किलपणाने म्हटलं. ''अस्स कां? हे माहीतच नव्हतं मला. छान... पण अगदी खरे खरे सांगा. आज असं भावूक होण्यासारखं घडलं तरी काय.''

माझ्या प्रश्नाचं उत्तर सफाईदारपणे टाळत म्हणतात कसे. ''अे चहा देना गरमागरम आलं घातलेला. आणि कडक बरं का?'' ''अहो देते पण आजच्या गाण्यातल मला रहस्य कळलंच पाहीजे बरं का?''

आणि मैत्रिणींनो काय सांगू त्याच दिवशी दुपारी ३।।–४ वाजण्याच्या सुमाराला मला रहस्याचा उलगडा ह्यांनी न सांगताच झाला बरं का?

समोरच्या दाताराच्या घरांत एक नवीन बिऱ्हाड महिन्यापूर्वी आलं आहे. ती बाईसुद्धा माझ्याच वयाची... ७० उलटून गेलेली. त्यांच्या घरातून पेटीचे स्वर एकदा दोनदा माझ्या कानावर पडलेले मी ऐकले होते. ते आठवले. त्यावर मी ह्यांना म्हटलं अग बाई त्या बाईना गाण्याची आवड दिसते. अगं... असेल आपल्याला काय करायचे आहे. पण त्या दिवशी अचानक दुपारी माझ्या घरी

आल्या. त्यांचं या म्हणून मी हसतमुखानी स्वागत केलं. त्यावर त्या खुर्चीवर ऐसपैस बसत म्हणाल्या, ‘‘मी शारदा धडपडे इथे समोरच राहायला आले आहे.’’ असेल असेल म्हणत मी त्यांना आमच्याकडे येण्याचे प्रयोजन विचारले त्यावर खुदकन हासत ते ही ह्या वयात बरं का...... त्या लगेच म्हणाल्या, ‘‘अहो तुमच्या मिस्टरांचं गाणं मी अगदी रोजच सकाळी ऐकते. त्या वेळेला रेडीओसुद्धा बंद करते. किती गोड आवाज आहे हो त्यांचा. जणुकाही जिभेवर खडीसाखरच विरघळली आहे असं मला वाटलं. मला ही खूप गाण्याची आवड आहे. पण आमचे हे.... मी गायला लागले की ह्यांच्या कपाळावर सतराशेआठ आठ्या. हे बाहेर पडले रे पडले की पेटी वाजवत बसते. तेवढाच विरंगुळा. पण तुमच्या ह्यांचं गाणं ऐकलं की मन अगदी तल्लीन होतं. वाटतं तुमच्या ह्यांनी असच सारखं गात रहावं. खरंच किती भाग्यवान आहात हो तुम्ही. घरात असा गाता गळा असला की घर कसं प्रसन्न राहतं नाही. सुगम संगीत म्हणजे आपल्या आनंदाचा ठेवाच असतो. नाहीतर आमचे हे.... नुसते अरसिक.’’

‘‘हो का मग तुम्हाला आमच्या गावात राहायला आल्याचा खूपच आनंद होत असेल ना? कारण आमच्याकडे रोजच सकाळी सुगम संगीत चालुच असतं आमच्या ह्यांचं.’’ ‘‘त्यावर त्या उत्साहाने म्हणाल्या आणि म्हणूनच मी तुमच्या ह्यांना विचारायला आले होते. तुम्ही पेटी वाजवायला बसाल तेव्हा मी पण येवू का गाणं म्हणायला. माझा ही आवाज खूप चांगला आहे हो. आवड आहे पण संधी नाही मिळाली चार लोकांसमोर गायची ह्यांच्या विचित्र स्वभावामुळे.

मी चेहऱ्यावर खोटा खोटा आनंद दाखवत मनात म्हटलं ‘‘छान म्हणजे ही सखी शेजारीण होवू पाहणारी अधूनमधून आपला गळा मोकळा करण्यासाठी येतच राहणार की काय. दोघांची आवड एकच म्हणजे आमच्या घरांत दर चार आठ दिवसांनी मैफीलच जमणार की काय. तेवढ्यात आमचे हे बाहेरून येताच शारदाबाई ह्यांचं हासत स्वागत करत म्हणाल्या ‘‘मिस्टर मराठे तुमचं खरंच कौतुक वाटतं. अगदी ह्या वयात तुमचा आवाज किती छान आहे.’’ हो त्यावर नेहमीचं ठेवणीतलं स्मितहास्य करत हे म्हणाले ‘‘स्वर आहे. आवाज टिकून राहयला आहे. दैवी देणगीच दुसरं काय?’’ त्यावर त्या भावना विवश होत म्हणाल्या ‘‘खरंच तुम्ही असेच गात रहा खूप आनंद मिळतो’’ असं मला म्हणत आमच्या दोघांचा निरोप घेत बाहेर पडल्या. शेवटी बायकी मत्सर माझ्यातला जागा झाला. त्या बाहेर पडताच मी ह्यांना म्हटलं ‘‘काय हो.... म्हणून आज सकाळपासून सखी शेजारीण तू हासत रहा आठवत होतात की काय. बरेच छुपे रूस्तम आहात की!’’ त्यावर गोंधळलेले चेहऱ्यावरचे भाव लपवत म्हणाले ‘‘अगं त्यांना गाण्याची आवड आहे. असे त्या एकदा मला वाटेत भेटल्या तेव्हा म्हणाल्या होत्या.’’ ‘‘मग बरोबर आहे. म्हणजे स्वतःसाठी न गाता ह्या बयेसाठी होतं तर सारं. छान छान’’ म्हणत मी स्वैपाकघरांत वळाले. जाता जाता अगदी सुरेल नसली तरी थोडीशी ह्यांना बेसूर वाटणारी गाण्याची ओळ म्हणत राहीले.

अधिक मजला सांगू नका गडे
तुमचे रहस्य मजला उलगडले. ♦



## मानसन्मान

• मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदरणीय **श्री. रमाकांत विद्वांस** (पृ. ६२३) यांच्या ‘आठवणी मुशाफिराच्या’ या पुस्तकाला सुप्रभात वृत्तसेवा साहित्य सेवा पुरस्कार प्राप्त झाला आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. रमाकांत विद्वांस यांचे हार्दिक अभिनंदन.

• **डॉ. वसुधा आपटे (विद्वांस)** (पृ. ६२३) ‘तिरंगा चॅलेंज विनर ऑफ नोबल एशियन ऑफ दि इयर ॲवॉर्डस २०१८’ हा पुरस्कार विख्यात शवविच्छेदक, शल्यचिकित्सक आणि न्यायवैद्यक डॉ. वसुधा विष्णु आपटे या मराठ्यांच्या माहेरवाशिणीला प्राप्त झाला आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा डॉ. वसुधाताईचे हार्दिक अभिनंदन.



## हसरे हितगुज

कारण माहीत आहे

आईनं काळजीनं विचारलं, ‘तुला खात्री आहे का तुला दिवस गेलेत म्हणून?’

‘हो ग आई. मी नक्कीच सांगते.’ कन्या विश्वासानं म्हणाली.

‘कशावरून म्हणतेस तू?’

‘कशावरून म्हणजे काय आई? – गेले तीनचार महिने मी रोज त्या डॉक्टरांकडं जातेय ना...!’

उपाय

एकजण डॉक्टरकडं गेला. त्याचा नंबर आल्यावर त्याला पुढ्यात घेऊन डॉक्टरानी विचारलं, ‘हं बोला, काय होतंय?’ त्यानं तपशीलवार सांगितलं. अंगात ताप आहे, खोकला येतोय, सभोवताल पेटल्यासारखा वाटतो...’

‘अस्सं. जरा तोंड उघडा – हं काय करता आपण?’

‘मी कवी आहे...’

‘मिटा तोंड; आणि पुन्हा सहसा उघडू नका...’ डॉक्टरनं पथ्य सांगितलं.

# ‘‘आमची शृंगेरी यात्रा’’

• सौ. विद्युल्लता अरुण मराठे (पृ. ५१२), तळेगाव भ्रमणध्वनी : ९२७२२२२३५०

**आ**पल्या जीवनातील प्रत्येक घटना ही केवळ भगवंताच्या इच्छेनेच होत असते. सन २०१४-१५ साल. आम्ही बडोद्याचे घर विकून तळेगावात रहाण्यास आलो. नवीन गाव, नवीन घर, ओळखी नाहीत. वेळ कसा जाईल असे वाटले पण विधात्याने त्याची योजना आधीच करून ठेवलेली होती. एक दिवस आम्ही फिरावयास निघालो असता निःशुल्क गीतासंथा वर्गाची जाहिरात वाचली व संथा वर्गात आम्ही दोघांची नाव नोंदवले. वर्ग सुरू झाला १८ ते २० जणांनी प्रवेश घेतला होता. आमच्या गुरु सौ. जयश्रीताई मेहेंदळे या गीता शिकवू लागल्या. एक एक श्लोक शांत, स्पष्ट उच्चारात त्या शिकवीत होत्या. पाणिनी व्याकरणाप्रमाणे खुणा करून मग त्याप्रमाणे म्हणायचे. एक एक श्लोक ६ ते ७ वेळा आमच्याकडून घोटून घ्यायच्या. मग प्रत्येकाकडून स्वतंत्रपणे म्हणवून घ्यायच्या. सर्वांनी वर्गात वेळेवर यायचे. येणे जमणार नसेल तर तसे आधी कळवायचे. स्पर्धा परीक्षांना बसायचे. ५०, ५५ वर्षानंतर पुन्हा शाळेत गेल्यासारखे वाटू लागले.

वास्तविक गीतेशी आमचा परिचय जुना होता. शाळेत १५वा अध्याय आम्हाला पाठांतराला होता. पुढे कॉलेजमध्ये १८वा ४था अध्याय ही मी अभ्यासिला होता. पण त्यावेळी त्याचे गांभीर्य समजले नव्हते. अर्थात् नंतर मात्र माझा गीतेशी संपर्क तुटला. बँकेतील नोकरी, मुख्यतः आकडेवारी. वाङ्मयाचा संबंध शून्य. घर, ऑफीस, संसार, मुलांच्या शाळा इत्यादीत वेळ म्हणून मिळायचा नाही. रिटायर झाल्यानंतर मात्र काहीतरी करावयास हवे ही जाणीव तीव्रतेने होऊ लागली. मग सवलतीच्या दरातील रामायण, महाभारत, भागवत, योगवासिष्ट इ. ग्रंथ विकत घेतले. व त्यांचे तसेच दासबोध, ज्ञानेश्वरी, गीतारहस्य यासारख्या ग्रंथांचे नियमित सामूहीक वाचन सुरू केले व त्याबरोबरच रोज एखादा गीतेचा अध्यायही आम्ही म्हणू लागलो. पण अध्याय म्हणतांना खूप अडचणी येऊ लागल्या.

पण हा क्लास चालू केल्यानंतर मात्र गीतेचे श्लोक शास्त्रशुद्ध कसे म्हणावे हे कळले. पण पूर्वीचे उच्चार तोंडात बसले असल्याने हे म्हणणे जड वाटू लागले. चुकू लागले. पण प्रयत्न चालू ठेवला.

स्पर्धेनिमित्त प्रथम एक अध्याय पाठांतर स्पर्धा नंतर २ अध्याय व नंतर ३ अध्याय पाठांतर स्पर्धा आणि गीताधर्ममंडळातील सर्वांसाठीचा खुल्या स्पर्धेत १ अध्याय व तळेगावच्या ‘‘अंबर’’च्या स्पर्धेत एक. अशारीतीने आमचे ८ अध्याय पाठ झाले. त्याबरोबरच ‘‘गीताव्रती’’ या लेखी परीक्षेसाठी अठरा अध्यायावरील स्वाध्याय सोडवून आम्ही गीताव्रतीची परीक्षाही त्यावर्षी दिली.

गीतासंथा वर्गाचा क्लास डिसेंबर १५ला संपन्न. मग आम्ही संपूर्ण गीता कंठस्थ स्पर्धेला बसण्याचे ठरविले. ती परीक्षा आम्ही नोव्हेंबर २०१६ला दिली. ‘‘ज्ञानेश्वरी प्रबोध’’ ही परीक्षाही द्यावी कारण ‘ज्ञानेश्वरी’ ही गीतेचीच टीका असल्याने गीतेच्या अभ्यासाला पूरक ठरेल म्हणून आम्ही दोघांनी ती परीक्षा एप्रिल २०१७ मध्ये दिली. संपूर्ण गीता कंठस्थ स्पर्धेनंतर बाईंनी आम्हाला शृंगेरीसाठी फॉर्म भरण्यास सांगितले. वास्तविक शृंगेरीचा प्रवास आम्हाला झेपणार नाही असे वाटत होते पण बाईंचा खूप आग्रह होता. म्हणून म्हटले आतापासून नाही कशाला म्हणायचे? जेव्हा तारीख येईल तेव्हा पाहू. बाई आमच्याकडून तयारी करून घेत होत्या. हां हां म्हणता तारीख येऊन ठेपली. आणि आता काय करायचे असा प्रश्न पडला. जगद्गुरु आद्य शंकराचार्यांच्या पवित्र भूमीत गीतापठण करून शंकराचार्यांचे आशीर्वाद घ्यावेत असे मनापासून वाटत होते व त्याबरोबरच बाईंनी घेतलेल्या परिश्रमाचे चीजही व्हावे असेही वाटत होते. म्हणून शेवटी भगवंताचे स्मरण करून शृंगेरीला जाण्याचे ठरविले. पुणे-बंगलोर, बंगलोर-मँगलोर असा विमान प्रवास करून रात्री मँगलोरला मुक्काम केला. आमच्याबरोबर आमची मुलगी व आमच्या ग्रुपमधल्या दोघीजणी होत्या. मंगलोरला गोकर्ण मंदिर पाहिले. मंदिर अतिशय सुंदर, भव्य, स्वच्छ व खास दक्षिणेकडील मंदिराच्या धाटणीचे होते. सुंदर शिल्पकृती मन मोहून घेते. मंदिराच्या दर्शनी भागात रथाच्या मागील बाजूस बसलेल्या अर्जुनाला उपदेश करणारी भगवान श्रीकृष्णाची नीलवर्ण प्रसन्न मूर्तीचेही दर्शन आम्हाला झाले. गीता पठणाला निघालेल्या आम्हा सर्वांना योगायोगाने हे दर्शन झाले. म्हणून अतिशय आनंद झाला. आशीर्वाद घेऊन आम्ही पुढील प्रवासास निघालो.

टॅक्सीने शृंगेरीला आलो. प्रवास २।। ते ३ तासांचा झाला. रस्त्यात घनदाट जंगलातून आमचा प्रवास चालला होता. सर्वांनी गाडीत गीतेचे अध्याय म्हटले. सकाळची रम्यवेळ, पावसाची रिमझिम व सभोवतालचा रम्य निसर्ग. वेळ कसा गेला कळलेच नाही. शृंगेरीत भक्तनिवास मध्ये जागा मिळाली.

आद्यगुरू शंकराचार्यांनी स्थापन केलेल्या ४ पीठांपैकी



हे वर्णन पाहिले की याप्रमाणेच या स्थळाची (शृंगेरीची) निवड तंतोतंत झाली आहे असे वाटते. आमची परीक्षा येथेच झाली. परीक्षा १।। तास चालली. सामूहिक प्रार्थनेनंतर सुरुवात केली ते एकदम २ऱ्या अध्यायातील २१व्या श्लोकाने ''वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम्। कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम्।।'' थोड्या श्लोकानंतर एकदम तिसऱ्या अध्यायातील मधलाच कुठला तरी श्लोक. अशारीतीने अथ ते इतिपर्यंत अध्याय म्हणून न घेता मधूनच एखाद्या श्लोकापासून सुरू करीत व पटकन दुसऱ्या अध्यायात शिरत. १४व्या अध्यायानंतर एकदम १६व्या अध्यायातील श्लोक म्हणायला सांगितले. अध्याय १ला व १५वा त्यांनी पूर्णपणे वगळलेच. ६वा अध्याय ५व्या श्लोकापासून म्हणजे उद्धरेदात्मनात्मानं... पासून तर १८वा अध्याय ''अधिष्ठानं तथा कर्ता...'' या १४व्या श्लोकापासून म्हणवून घेतला. शेवटी ''यत्रगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।। हा शेवटचा श्लोक म्हणायला सांगून ते उठले. थोड्याच वेळात त्यांनी निकाल पाठविला. २१ हजाराचे पहिले पारितोषिक होते. आम्हाला दोघांना १८ हजार व १५ हजाराची बक्षिसे मिळाली. कार्यालयातून प्रशस्तिपत्रक, आद्य शंकराचार्य व श्रीशारदाम्बेचा फोटो प्रसाद व एक पुस्तिका भेट मिळाली. बक्षिसाचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. या पवित्र भूमीत आम्हाला गीतागंगोदकाचा आस्वाद घेता आला. म्हणून आम्ही सर्वजण कृतार्थ झालो. मग शारदाम्बेचे दर्शन घेऊन आम्ही परतलो. माझ्या जीवनातील ही अविस्मरणीय घटना असे मी म्हणेन. पण या यशाचे श्रेय माझे नाही. भगवंतानी आमच्याकडून ते करून घेतले. ''मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम्'' याचा अनुभव आला. आमच्या गुरू सौ. जयश्रीताई मेहेंदळे यांनी आमच्यासाठी घेतलेले अथांग परिश्रम त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच. आम्ही एकटे प्रवास करू शकणार नव्हतो. पण आमची मुलगी आमच्याबरोबर आली. तिकीटे काढण्यापासून परत येईपर्यंतची आमची सर्व काळजी तिने अत्यंत प्रेमाने घेतली. त्यामुळेच शृंगेरीला जाणे आम्हाला शक्य झाले. घरातील सर्व स्वयंपाकादी जबाबदारी तिच्या सासूबाईनी काहीही तक्रार न करता प्रेमाने उचलली तेव्हा याचे श्रेय या सर्वांनाच आहे. भगवंताला आमच्याकडून करून घ्यायचे होते हेच खरे. ज्या योगेश्वर कृष्णाने एकाच वेळी या ट्रीपमध्ये आम्हाला ऐहिक व पारमार्थिक लाभ करून दिला त्या योगेश्वराला आमचे शतशः प्रणाम. ♦

दक्षिणेकडचे श्री शारदापीठम् शृंगेरी हे आहे. परमपूज्य जगद्गुरु श्री श्री भारतीतीर्थ महास्वामिजी हे श्री शारदापीठ शृंगेरी मठाचे गुरुपरंपरेतील ३६ वे पीठाधीश असून इ.स. १९८९ पासून ते या अलौकिक शांकरमठाची धुरा समर्थपणे सांभाळीत आहेत. ते तपस्वी, अद्वितीय अध्यात्मिक श्रेष्ठता व बुद्धिमत्ता यामुळे सुविख्यात आहेत. तुंगभद्रा नदीच्या तीरावर सुंदर वनराईने नटलेला शृंगेरीमठ हा तेथील पक्षांचा किलबिलाट व वृक्षवेलींचा मंद सुगंध सर्व भक्तांचे मन निश्चितच मोहून टाकतो.

येथे शारदाम्बेचे भव्य, सुंदर मंदिर आहे. जवळच चंद्रमौलेश्वराचे मंदिर आहे. शंकराचे हे देऊळ अतीप्राचीन म्हणजे जवळ जवळ ८०० वर्षापूर्वीचे असून संपूर्ण दगडाचे आहे. त्यात १२ खांबांवर १२ राशी दाखविल्या आहेत. आद्यगुरू श्रीशंकराचार्यांचेही देऊळ जवळच आहे. नदीवरचा पूल ओलांडून पलीकडे गेल्यावर भव्य गुरूभवन आहे. येथील सभोवतालचा भव्य विस्तार वृक्षवेलींनी बहरलेला आहे. सगळीकडे अगदी स्वच्छता, शांतता व रम्य निसर्ग. सहाव्या अध्यायात योगाभ्यासासाठी कसे स्थान असावे याबद्दल भगवंत म्हणतात ''शुचौदेशे प्रतिष्ठाप्य स्थिर मासनमात्मनः''...

श्लोक ११ यावर ज्ञानेश्वरांनी केलेले भाष्य जसे –

जेथ अराणुकेचेनि कोडे। बैसलिया उठो नावडे।

वैराग्यासी दुणीव चढे। देखिलिया जे।।

जेथ अमृताचेनि पाडे। मुळेही सकट गोडे। जोडती दाटे झाडे। सदा फळती।।

...आणि अशा ठिकाणी ''ऐसे जे सुंदर। पावन उत्तम। जेथे भेटे ब्रह्म।।

मूर्तिमंत। आणि ''तेथे निगूढ मठ होआवा। का शिवालय।''

# शोनाड

• सौ. मीना सदानंद मराठे (पृ.४१४), बांद्रा दूरध्वनी – ०२२-२६४५९५३०

मथळ्यावरून कुणालाच कळणार नाही की ''शोनाड'' म्हणजे कोण?

अहो, शोनाड म्हणजे माझी 'मनीमाऊ'. आमचे चेंबूरचे घर हे अनेकांचे माहेरघर, आश्रयघर, आधारघर होते. ते केवळ माणसांचेच नव्हे तर प्राणी व पक्षांचेही आश्रयस्थान होते.

आमच्या घरी मोत्या नावाचा कुत्रा होता व मनी नावाची मांजरी देखील होती. त्यावेळी मी असेन साधारण १० वर्षांची. नेहमी घरात न राहणारी मनी अचानक घरात राहू लागली. सतत काहीतरी खायला मागू लागली. एकूण लक्षणे पाहून आजींच्या लक्षात आले की मनीला आता पिल्ले होणार आहेत.

मनीला पिल्ले होणार, या बातमीने मी खूप आनंदीत झाले. मनीला नियमितपणे दूध, पोळी, बिस्किटे देणे मी सुरू केले. मनीच्या हालचाली मंद गतीने होऊ लागल्या. तिच्या पोटाच्या आकारावरून ती आता लवकरच बाळंत होणार, हे कळू लागले. एके दिवशी दुपारपासून मनी, म्याव म्याव, करीत हॉलच्या कोपऱ्या कोपऱ्यात फिरत होती. मी तर खूपच बावरून गेले. मनूला पिल्ले होणार मग डॉक्टर कोण येणार? असा प्रश्न माझ्या बालमनाला पडला. याच विचारात मी रात्री झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी उठले तर मनूचा पत्ता नाही. सगळे कसे शांत शांत! मी माऊला घरभर शोधले. पलंगाखाली अंधारात काहीतरी कुरकुर ऐकु आली म्हणून बॅटरीच्या उजेडात पाहिले तर काय, माऊ आपल्या तीन पिल्लांना कुशीत घेऊन शांत बसली होती. दोन दिवस माऊ तेथून हलली देखील नाही. तिसऱ्या दिवशी परत बॅटरीच्या उजेडात पाहिले तर काय ३ पिल्ले ३ वेगळ्या रंगाची होती. एक पांढरे शुभ्र व त्यावर मातसर रंगाचे पट्टे, दुसरे काळे पांढरे व तिसरे काळेकुट्ट.

तिसरे काळेकुट्ट पिल्लू पाहून सर्वांनी शी ऽ किती काळेकुट्ट आहे हे! अशी प्रतिक्रिया दिली. पण मला मात्र त्याची दया आली. त्या पिल्लाविषयी माझ्या मनात अधिकच आपुलकी निर्माण झाली. काळेकुट्ट असले तरी काय झाले, किती निष्पाप आहे ते!

दिवसेदिवस माऊच्या वेगळ्याच हालचाली चालू होत्या. तिने पिल्लांना तोंडात धरून सात वेळा जागा बदलल्या. मांजर सात वेळा जागा बदलते. जन्मल्या जन्मल्या ती एका पिल्लाला खाऊन टाकते. हे सामान्य ज्ञान मला माऊला भेटायला आलेल्या मंडळींकडून मिळाले. माऊची पिल्ले १५ दिवस डोळे उघडत नाहीत नुसतीच मिऊमिऊ आवाज करतात. आपण पिल्लांना हात लावायला गेलो तर ती आपल्यावर पंजाने वार करते. मांजरीची नखे बोटांच्या आत लपलेली असतात, मनी खूप रागावली तर ती शेपटी फुगवते. कधीकधी फुत्कारते देखील. हे सर्व मांजरीविषयीचे ज्ञान मला प्राप्त झाले.

हळूहळू पिल्लांच्या हालचाली सुरू झाल्या. त्यांनी डोळे उघडले, ती आता हळूहळू उभी राहू लागली. माझी विशेष नजर मात्र त्या काळ्या पिल्लावर असे. काळ्या पिल्लाच्या डोळ्यांचा रंग हिरवा होता. मनू आपल्या पिल्लांना कुशीत घेऊन दूध पाजत असे. चाटून साफ करीत असे. ती देखील पिल्लांमध्ये काळे – गोरे भेदभाव करीत नसे.

दिवसामासी पिल्ले वाढू लागली. खेळू लागली. आवाज ऐकला की घाबरून पळू लागली. आडोशाला लपू लागली. मी हलविलेल्या लोकरीच्या दोऱ्याशी खेळू लागली. मनू आता आपल्या पिल्लांना घेऊन अंगणात जाई. त्यांना घेऊन उन्हात बसे. त्यांचे लाड करी. पिल्ले देखील एकमेकांशी खेळत, भांडत, मनीच्या अंगावर उड्या मारीत असत. ह्या सर्व हालचाली निरखण्यात मला खूप मज्जा येई.

एके दिवशी अचानक मनू जीवाच्या आकांताने म्यावम्याव ओरडू लागली. सर्वत्र फिरून शोधू लागली. असे लक्षात आले की काळेकुट्ट पिल्लू सोडून कोणीतरी माऊची दुसरी दोन पिल्ले पळविली होती. मनू प्रमाणे मलाही खूप दुःख झाले. मनूने दोन दिवस काही खाल्ले नाही किंवा दूध देखील प्यायले नाही. शेवटी मातृत्वाची भावना ही प्राण्यांनाही असते हे मला जाणवले.

मी मनाशी पक्के ठरविले की या काळ्या पिल्लाला जपायचेय त्याची खूप काळजी घ्यायची. अचानक एके दिवशी मनू देखील कुठेतरी गायब झाली. मी त्या काळ्या पिल्लाला उचलून घेतले, त्याच्या पाठीवरून हात फिरविला व म्हणाले घाबरू नकोस 'शोनाड' मी तुझी काळजी घेईन. अशा प्रकारे मी मनतल्या मनात त्या पिल्लाचे बारसे केले व त्याचे नाव ठेवले 'शोनाड घोलो' पिल्लालापण आडनाव नको का? हे माझ्या बालमनातील विचार!

झाले, त्या दिवसापासून शोनाडसाठी माझ्या खोलीच्या कोपऱ्यात जुना टॉवेल पसरून त्यावर मऊरूमाल घालून तिची

गादी तयार करून, झोपायची व्यवस्था केली. तिच्यासाठी बशीमध्ये दूध, पसरट वाटीत पोळी, बिस्किटे. मला लाडकी सोबतीण मिळाली म्हणून मी खूश झाले तितकीच शोनाडही खूश होती हे निश्चित.

त्यानंतर रोज शोनाडशी खेळणे, तिला खायला देणे, तिचे लाड करणे असा दिनक्रम सुरू झाला. शोनाड घरात कधीच घाण करीत नसे. तिला शी – शू करायची असेल तर दाराशी जाऊन उभी राही. दार उघडून दिले की अंगणात जाऊन माती उकरून एक छोटा खड्डा खणून टाकीत असे. मला वाटते. मांजर हा एकच प्राणी या बाबतीत इतका समंजस असावा. नंतर शोनाड आमच्या अंगणात फिरून आपला मॉर्निंगवॉक पूर्ण करी. कोवळ्या उन्हात बसून आपले अंग चाटून साफ करीत असे. नंतर पाय लांब करून व्यायाम केल्यासारख्या हालचाली करीत किती शिस्तबद्ध होती माझी शोनाड! नंतर पळत पळत वर येऊन बशीतील दूध पित असे. वाटल्यास सिस्किटाचाही आस्वाद घेई. हे सगळे झाले की टुणकन उडी मारून माझ्या पलंगावर झोपी जाई. दिवसा मासी बाळाची जशी प्रगती होते तशीच शोनाड देखील वाढत होती.

तिला आता आपले लाड कोण करते, आपल्यावर कोण रागावते हे बरोबर समजे. माझे आजी आजोबा शोनाडचे खूप लाड करीत असत. आजी तिला प्रेमाने दूध देत तर आजोबा प्रेमाने तिच्या पाठीवर हात फिरवत. शोनाडच्या गळ्याला खाजविलेले तिला खूप आवडे. तिने जवळ येऊन पायाशी डोके घुसळले की तिला आता लाड करून घ्यायचे आहेत हे मी समजे. मी 'शोनाड घोलो' ही प्रेमाने मारलेली हाक तिला समजे.

रोजरोज दूध भात, पोळी, बिस्किटे खाण्याचा तिलाही कंटाळा येई. मग ती अंगणातल्या बागेत जाऊन उंदीर, कबूतर, झुरळ यांची शिकार करून नॉनव्हेज वर ताव मारी. त्या दिवशी नंतर ती कुंभकर्णासारखी झोपून राही. कधी पायाला काही लागले तर तोंडाने चाटून, त्या जखमेवर औषध लावी. कधी बरे वाटत नसेल तर गवती चहाची पाने खाई. जणू काही आयुर्वेदिक औषधे तिला माहिती होती. शोनाडला जवळून न्याहाळताना एक गोष्ट मला समजली की मांजर कोणासमोर पाणी पीत नाही व दूध पिताना डोळे घट्ट मिटून घेते. खरे तर शोनाडच्या सहवासात असताना मला 'मांजरण या विषयावर पीएचडी देखील करता आली असती.

आमच्या घराचा दिवाणखाना खूप मोठा होता. मी तेथेच टेबलखुर्चीवर बसून अभ्यास करीत असे. अभ्यास करताना हॉलचे दार लोटलेले असे. मी कोठे बसले आहे हे शोनाडला माहिती असे. तिची पोटपूजा झाली की ती हळूच दार लोटून आत येई. ती दारातूनच 'म्याव' अशी हाक देई जणू काही May I Come in? असे म्हणत असे. आत आली की पटकन उडी मारून माझ्या मांडीवर बसे. माझा अभ्यास साधारणपणे ३ तास चालू असे व शोनाड आरामात माझ्या मांडीवर पहुडलेली असे.

माझी लाडकी शोनाडमात्र आमच्या मातोश्रींना अजिबात आवडत नसे. ती कायम शोनाडवर खेकसत असे. तिचा माझ्या शोनाडवर कायम राग होता. एके दिवशी ती शोनाडवर इतक्या जोरात खेकसली की मला ते सहनच झाले नाही. मी रागाने शोनाडला एक फटका मारला व तिला घराबाहेर हकलले. माझ्या वागण्याचा मला खूप पश्चाताप झाला. मी दार उघडले. अपराधी चेहेऱ्याने शोनाड दारात उभी होती. मी तिला जवळ घेऊन खूप रडले. तिची क्षमा मागितली. कितीतरी वेळ तिच्या पाठीवरून हात फिरवित राहिले. शोनाडलाही माझ्या भावना कळल्या असाव्यात.

वरील प्रसंगाची पुन्हा कधी वेळ येऊ नये म्हणून मी मनावर दगड ठेवून, शोनाडला रेल्वे फाटका पलीकडे सोडून ये, असे नानाला सांगितले. नानाने संध्याकाळी शोनाडला एका कापडी पिशवीत घातले व तो तिला रेल्वेफाटकापलीकडे सोडून आला. मी तसे सांगितले खरे पण मी कासावीस झाले. रात्र झाली. पावसाळ्याचे दिवस होते. १० जूनची रात्र, मी रात्रभर जागीच होते. शोनाडची खूप आठवण येत होती. आभाळातून पडणाऱ्या पावसाबरोबर माझ्याही डोळ्यांना अश्रू आवरत नव्हते. पहाटेचे ४ वाजले. अंगणात 'म्याव' 'म्याव' असा आवाज आला. मी धावत जाऊन गॅलरीचे दार उघडले. बॅटरी लावून आवाजाच्या दिशेने प्रकाश झोत टाकला. तिचे हिरवे डोळे लुकलुकले. मी जोरात हाक मारली 'शोनाड' ताबडतोब जिना चढून शोनाड वर आली. मी दार उघडून तिला आत घेतले. तिला जवळ घेऊन आता परत कधीच असे करणार नाही असे वचन, मी तिला दिले.

त्यानंतर कुणाच्याही हरकतीची पर्वा मी केली नाही. शोनाड माझ्या सोबत १३ वर्षे होती. माझे लग्न ठरले. माझ्या साखरपुड्याचा पेढा मी तिला भरविला. लग्नानंतर माहेरी गेले कि तिची भेट होई पण आता ती अंगणात असे त्यामुळे क्वचित प्रसंगी तिची गाठ पडे.

त्या वर्षीची होळी पौर्णिमा मला अशुभ ठरली. अंगणात मागीलदारी होळी पेटविली जाई. आग शांत झाल्यावर सर्व जण घरी जाऊन झोपी गेले. अंगणात फिरणारी शोनाड उबेसाठी, होळी जेथे पेटविली होती त्या ठिकाणी गेली असावी. वरून शांत झाले असले तरी आत निखारे धगधगत असावे कदाचित रात्रीच्या झोपेमध्ये तिचा चित्कार कुणालाच ऐकू आला नसावा. दुसऱ्या दिवशी सर्वांना दिसली ती राखेन माखलेली होरपळलेली, निर्जीव शोनाड.

दुसऱ्या दिवशीच्या रंगपंचमीचा बेरंग झाला होता. माझ्या शोनाडचे म्याव म्याव आता कुणालाच ऐकू येणार नव्हते.

♦

# वाचकांचा पत्रव्यवहार



**स.न.वि.वि.**


गेल्या आठवड्यात दूरध्वनिवरून बोलणे झाल्याप्रमाणे कै. भाऊ मराठे यांच्या विषयीची एक हृद्य आठवण लिहीत आहे.

मराठे प्रतिष्ठान (पुणे शाखा)च्या एका कार्यक्रमात भाऊ मराठे उपस्थित होते. त्यानी केलेल्या अति सुंदर भाषणात आचार्य अत्रे यांच्या दिग्गज व्यक्तित्त्वाविषयी स्वतःच्या दमदार, प्रभावी आवाजात काही आठवणी सांगितल्या. त्यामध्ये आचार्य अत्रे यांनी गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या विषयी लिहिलेल्या एका लेखातील मजकूर, कुठलाही आधार हाती न धरता सांगितला. स्व. भाऊंच्या या भाषणाने मी खूपच प्रभावित झालो. हॉलच्या बाहेर मी त्यांना भेटलो. तेव्हा मी माझी खुशी त्यांना सांगितली. पुढे त्यांचा मुंबईतला पत्ता मिळवून मी त्यांना एक पत्र लिहिले व त्यांना विनंती केली की, त्यांनी आचार्य अत्र्यांच्या लताबाई विषयीच्या संबंधित लेखाची एक झेरॉक्स प्रत माझ्याकडे पाठवावी. त्यानंतर त्यांनी त्यांच्या अतिशय सुरेख अक्षरात आचार्य अत्र्यांच्या लेखाची प्रत माझ्याकडे पाठविली. भाऊंच्या या अतिशय हृद्य कृतीने मी खूपच भारावून गेलो. स्व. भाऊंच्या १४ जानेवारी २००८ रोजीच्या पत्राची व त्या सोबतच्या आचार्य अत्र्यांच्या लेखाची झेरॉक्स प्रत 'हितगुज'साठी पाठवीत आहे. कळावे.

आपला

**श्रीराम मराठे**, पुणे

## कै. भाऊ मराठे यांनी लिहिलेले पत्र



सदानंद (भाऊ) मराठे

नीलमणी,
३२, शिवाजी पार्क,
डॉ. म. ब. राऊत रोड,
दादर, मुंबई : ४०००२८
१४ जानेवारी २००८

॥श्री॥

ती. श्री. श्रीराम मराठे,
सस्नेह नमस्कार

आपले २८ डिसेंबरचे पत्र ५ जानेवारी रोजी मिळाले. मी दुबईच्या दौऱ्यावर असल्यामुळे उत्तर पाठवायला उशीर झाला त्याबद्दल दिलगीर आहे.

आपण पत्रात माझी खूप स्तुती केली आहे. स्तुती कुणाला आवडत नाही? पण माझ्या जडण-घडणीचं सर्व श्रेय मी माझे ती. वडील आणि ती. आई यांना देतो. माझं पाठांतर काहीच नाही असं ती. आचार्य अत्र्यांचं पाठांतर होतं. ७० व्या वर्षी इयत्ता ९ वी मध्ये शिकलेली कविता धडधड म्हणून दाखवली होती.

आपणास हवी असलेली आचार्य अत्र्यांनी लता मंगेशकरवर लिहिलेल्या अग्रलेखाची सुरुवात सोबत पाठवीत आहे.

बाकी सर्व क्षेम. घरातील सर्व मंडळींस यथोचित नमस्कार - आशिर्वाद

स्नेहांकित

**स्वरलता**

यक्षाचं कूजन, वाहणारा झरा, मोराचं नृत्य, पहिल्या पावसाच्या मातीचा गंध याला विशेषण लावण्याच्या फंदात पडू नये त्याचप्रमाणे सच्चा प्रामाणिक सूर त्याला फक्त 'लता' म्हणावं! अति परिचयानेसुद्धा ज्याची अवज्ञा झाली नाही अशी एकच गोष्ट म्हणजे लताचा निखळ मुक्त सूर. लताचा कंठ म्हणजे मानवी ध्वनिसृष्टीतील एक अद्‌भूत चमत्कार आहे. उर्वशीच्या नुपूराची रूणझुण : सरस्वतीच्या वीणेचा झंकार आणि कृष्णाच्या मुरलीची साद हे सर्व एकवटून साक्षात विधात्यानेच लताचा कंठ घडवला असला पाहिजे. लोखंडाच्या निफातून उतरलेल्या शाईने आणि वृत्तपत्राच्या जाड्याभरड्या कागदावर लताच्या कंठाला अभिवादन करणे म्हणजे एखाद्या अप्सरेच्या स्वागतासाठी तिच्या मृदु चरणकमलाखाली गोणपाटाच्या पायघड्या अंथरण्याइतकं विशोभित आहे. लताच्या कंठाला साजेसं अभिवादन करायचं तर त्यासाठी प्रभातकालची कोवळी किरणं दव बिंदूमध्ये भिजवलेल्या शाईने कमलतंतूच्या लेखणीने वायूलहरीच्या हलक्या हाताने : फूलपाखराच्या पंखांवर लिहिलेलं मानपत्र गुलाबकळीच्या करंडकातून लताला अर्पण करायला पाहिजे.

**– आचार्य अत्रे**



# हसरे हितगुज

**नातू** : हॅलो, आजोबा इंद्रजीत बोलतोय.

**आजोबा** : ऐकू येत नाहीये, कोण बोलतंय?

**नातू** : इंद्रजीत, आजोबा इंद्रजीत!!

**आजोबा** : कशाला बोलतोयस पण इंग्रजीत? आधी मराठी बोल स्पष्ट...

**बायको** : अहो, उठा. मी पोळ्या करायला घेतेय.

**नवरा** : मग, मी काय तव्यावर झोपलोय का?
(स्थळ : अर्थातच पुणे)

**दुहेरी शिक्षा**

पूर्वी एका जेलवर काम करणारे दोन पोलीस अधिकारी बऱ्याच वर्षांनी भेटले. ख्याली खुशाली झाल्यावर एकाने विचारलं, 'काय रे, तुझ्या पत्नीनं एक प्रयोग म्हणून कैद्यांसाठी गाणी गायला सुरुवात केली होती, ते चालू आहे का अजून?''

'छे रे, चार आठ दिवस केलं ते', तो दुसरा उत्तरला, 'पण कैद्यानी तक्रार केली की, हे बंद झालं पाहिजे, त्यांच्या शिक्षेत याचा समावेश नाही... '

# थोरली एकादशी

• नंदकुमार मराठे (पृ. २१७), कोल्हापूर भ्रमणध्वनी – ९९६०६३६०४०/९९७५४२९४९४

आषाढाच्या प्रचंड मोठ्या पर्जन्यधारा पडू लागल्या की, आषाढी एकादशीची चाहूल लागते. ग्रामीण भागात थोरली एकादशी म्हणून या एकादशीचे नामकरण आपसुकच झाले आहे तर कार्तिकी एकादशीला धाकली एकादशी म्हणून ओळख तयार झाली आहे.

परंतु प्रत्यक्षात वैष्णव संप्रदायिकात हरिप्रिया म्हणजे विष्णूला प्रिय असणारी ही एकादशी हरिदिनी म्हणून सुपरिचित आहे. एकादशीत स्मार्त आणि भागवत असे दोन भेद असून 'निर्णयसिंधू' आणि 'धर्मसिंधू' या ग्रंथात याचा विस्तार आढळतो. शूलपाणी लिखित 'एकादशी विवेक' आणि रघुनंदनाचा एकादशीत्व हे संस्कृत ग्रंथ मध्ययुगात रचले आहेत. व्रतराज, व्रतशिरोमणी या ग्रंथात एकादशीचे माहात्म्य विवेचनात्मकरित्या आढळते.

एकादशीच्या काम्य व्रताचरणाविषयी 'कात्यायन' या धर्मपंडितांनी भाष्य केले आहे. पद्मपुराणात एकादशी व्रताच्या पुण्यकर्माशी तुलना अश्वमेध व राजसूय यज्ञाशी केली आहे. पद्मपुराणातही याचे उल्लेख आढळतात.

हेमांद्री व यादवकालीन धर्मपंडितांची 'चतुर्वर्ग चिंतामणी' ग्रंथात शुक्ल व कृष्ण एकादशीचे मृगारूढ व कमलारूढ सिंहमुखी पुष्ट व कृश असे या एकादशीचे ध्यानरूप वर्णन केले आहे.

महाराष्ट्रातील भागवत सांप्रदायिकांनी आषाढी एकादशी (शयनी एकादशी) कार्तिक शुक्ल एकादशी (प्रबोधिनी एकादशी) यांना महाएकादशी असे संबोधले आहे. या एकादशीला लाखो वारकरी तीर्थक्षेत्र पंढरपुरात पालखी, दिंडी, पायी दिंडी, टाळ, मृदुंगाचा गजरात 'कंठी मिरवा तुळशी', 'व्रत करा एकादशी' हा नामजपात रंगून गेलेले दिसतात.

दशमी, एकादशी, द्वादशी हे तीन दिवस हरिचिंतनात व्यतीत करणारे एकादशी व्रत संत एकनाथांनी वर्णियले आहेत.

नामदेव गाथा, संत तुकाराम गाथा यामध्ये एकादशी उपवासाची संहिता सांगितली आहे. भीमा माहात्म्य ग्रंथातील भक्ती संकेतानुसार गेली सात शतकाहून अधिक काळ तीर्थक्षेत्र पंढरपुरात चंद्रभागेच्या तीरावर गोपवेषधारी हरिच्या दर्शन पूजनात भक्तगण रममाण होत आहेत.

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनास विभूतीयोग सांगताना मार्गशीर्ष मासाचे व एकादशी उपवासाचे काही संदर्भ आढळतात. मूळ संस्कृत ग्रंथात प्रथम कृष्ण पक्षातील नंतर शुक्ल पक्षातील एकादशी कथा सांगितली आहे. धर्मशास्त्रात आठ वर्षांपासून ऐंशी वर्षांपर्यंतच्या प्रत्येक व्यक्तीस हे व्रत करता येईल, असे संकेत दिले आहेत.

प्राचीन काळी नैमिष्यारण्यात शौनक ऋषी आणि सूत यांच्या संवादातून एकादशी व्रताची कथा संपन्न झाल्याचे आढळून येते. कृतयुगात महाबली नाडीजंग नावाच्या असुराच्या हजारो वर्षे वायुभक्षण करून अंगठ्यावर उभे राहून केलेली तपश्चर्या त्यास भगवान शंकराने दिलेले वरदान त्यातून घडलेले प्रसंग व त्याचा चतुर्भुज कन्येने केलेला वध या प्रसंगातून एकादशी उत्पती असे वर्णन पुराणात आढळते.

दर पंधरवड्याची १, महिन्याच्या २, एक वर्षाच्या २४ व अधिकमासाच्या २ अशा २६ एकादशांचे वर्णन पुराणात आढळते.

वर्षातील सर्व एकादशींची महिन्यानुसार नावे अशी आहेत :

- मार्गशीर्ष शुक्ल मोक्षदा, मार्गशीर्ष कृष्ण सफला,
- पौष शुक्ल पुत्रदा, पौष कृष्ण षट्तीला,
- माघ शुक्ल जया, माघ कृष्ण जया,
- फाल्गुन शुक्ल आमलकी, फाल्गुन कृष्ण पापमोचिनी,
- चैत्र शुक्ल कामदा, चैत्र कृष्ण वरुथिनी,
- वैशाख शुक्ल मोहिनी, वैशाख कृष्ण अपरा,
- ज्येष्ठ शुद्ध निर्जला, ज्येष्ठ कृष्ण योगीनी,
- आषाढ शुद्ध शयनी, आषाढ कृष्ण कामिका,
- श्रावण शुक्ल पुत्रदा, श्रावण कृष्ण अजा,
- भाद्रपद शुक्ल परिवर्तिनी, भाद्रपद कृष्ण इंदिरा,
- आश्विन शुक्ल पाशांकुशा, आश्विन कृष्ण रमा,
- कार्तिक शुक्ल प्रबोधनी, कार्तिक कृष्ण उत्पत्ती,

अधिक मासातील : पुरुषोत्तम शुक्ल पद्मिनी, पुरुषोत्तम कमला अशी एकादशींची नावे आहेत.

याबाबत ब्रह्मांडपुराण भविष्योत्तर पुराण, स्कंदपुराण, वराह पुराण, कुर्मपुराण, ब्रह्मावर्त पुराण यात सर्व एकादशींचे विविध पौराणिक उल्लेख आढळतात.

राजधर्मात तत्वद असलेल्या समस्तांनी शुक्ल व कृष्ण असा भेदाभेद अमंगळ मानला आहे. विष्णुधर्मासारखा गीतेसारखे महत्त्व एकादशी व्रतास शास्त्रकारांनी दिले आहे.

# अमावस्येची भीषण रात्र

• श्री. गोविंद ना. मराठे (पृ. ५४१), गोवा भ्रमणध्वनी – ९७६५०४२५६६

**मा**झे मूळ गाव डिचोलीतील पाळी. शिक्षणानिमित्त बेळगाव कर्नाटक येथे मोठ्या भावाकडे राहत होतो. अकरावी पास झाल्यावर रोजगार केंद्रामध्ये नाव नोंदविले. परंतू नोकरी काही मिळेना, हताश झालेलो.

माझ्या नशिबात किंवा पूर्व पूण्याईने त्यावेळी भारताचा एक भाग पोर्तुगीजांच्या जोखडाखाली भरडलेला होता. तो गोमंतक भारताचे भूतपूर्व व पहिले पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू व संरक्षण मंत्री कै. कृष्णमेनन यांनी तिन्ही दलाच्या मदतीने कारवाई करून १९ डिसेंबर १९६१ रोजी स्वतंत्र करून गोवा हा भारताच्या मुकूटातील तुरा खोवला. त्यांना माझे शतशः प्रणाम!

गोवा स्वतंत्र झाला. पहिल्या निवडणूकाही झाल्या. आणि गोव्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून म.गो. पक्षाचे दयानंद बाळकृष्ण उर्फ भाऊसाहेब बांदोडकर आले. त्यांच्याच पूण्याईने गावागावात सरकारी प्राथमिक शाळा झाल्या. हा माझा जीवन प्रवासातील आनंदाचा व भाग्याचा सुवर्णकाळ झाला.

मी मूळ गोमंतकीय असल्याने आम्हाला प्रथम प्राधान्य होते. बेळगावातून शिक्षकाच्या जागेसाठी पणजीला अर्ज पाठविला. त्याचे आठ दिवसात मुलाखतीसाठी पत्र आले. मुलाखत झाली आणि आठ दिवसांत माझी नेमणूक सत्तरी तालुक्यातील दुर्गम भागात श्रीराम मंदिरात खडकी येथे झाली. तो दिवस होता १२ डिसेंबर १९६२ किती योगायोग पाहा डिसेंबरचा.

पाळी येथील पूर्वजांच्या घरातून बाडबिस्तरा घेऊन शाळेपासूनच्या जवळच वेळगे येथे जोशी नावाच्या सद्‌गृहस्थाच्या सदनिकेत एक खोली घेतली व तेथूनच शिकवण्यासाठी दोन किलोमीटरवर चालत खडकी येथे जात होतो. जेमतेम सहा महिने अध्यापनाचे काम केले. पण याच काळात आयुष्यभर लक्षात राहण्यासारखी एक घटना घडली. त्यातून मी सावरलो म्हणून ती गोमंतकला पाठविली आहे ती अशी –

शाळेच्या सरकारी कामानिमित्त मी वेळगेच्या निवासातून एक दिवस दोन किलोमिटरच्या वाळपई बस स्थानकावर पोचलो. साडेसातची बस सगळीच साडेसाती. अमावस्येचा काळोख. पणजीला पोचलो. सगळी कामे उरकली तोपर्यंत पाच वाजले. त्यावेळी पणजी वाळपई बस साडेपाचची शेवटची वाळपईला येईपर्यंत सात वाजले. गडद अंधार काळोखी रात्र व वेळग्याला जायला वाहन नव्हते. खिशांत पाच रुपये. मेणबत्तीव काड्याची पेटी घेतली. मुक्कामाचे ठिकाण दोन किलोमीटर.

चालत राहिलो. मेणबत्ती पेटवून थोडे चालल्यानंतर शेती लागली. नवीन मशागत केलेली होती. रोपे वाढली होती. शेताच्या मधल्या वाटेवरून चालत राहिलो. दोन वेळा पाय घसरला. पुन्हा जोमाने चालत राहिलो. शेतीची वाट संपून काजूचा डोंगर लागला. पायवाट होती. रातकिडे ओरडत होते. पानाची सळसळ श्वापदांची भिती जीव मुठीत धरून देवाचे नाव घेत होतो. मदतीला तो परमेश्वर हात देत होता. अखेर डोंगर कपारी संपून नदी काठ दिसू लागला. क्षणोक्षणी मृत्यू समोर दिसत होता. सत्वपरीक्षेची वेळ निवासस्थान जवळ येत होतं. आता मार्गक्रमण नदीकाठावरून चालू होत. समोर सळसळ पण मंदगतीने वहाणारे पाणी व काळेभोर आकाश अखेर नदी पार करून पुढे जायचे होते. पाणी गुढगाभर होते. कारण दिवस उन्हाळ्याचे होते.

अचानक समोर मध्यभागी पाच–सहा माणसे हाती पेट्रोलमॅक्स दिवे निःशब्द शांतता वाटले ही माणसे कोणाचे दहन करण्यासाठी या ठिकाणी आली असावी. आणखी त्यांना वाट विचारावी तर ते दुःखात असतील न विचारावी तर पोचणार कसा. मनाचा हिय्या करून बागायतीच्या खाली पोचलो. वाट दिसेना. पायात काटे टोचले. सर्वांग ओरबाडून निघाले. बुडत्याला काठीचा आधार त्याप्रमाणे रेडिओवरील गाणे ऐकू आले. जीव भांड्यात पडला त्या दिशेने चालल्यावर घर गाठले. तोपर्यंत रात्रीचे साडे नऊ वाजले. घरातील नातलगांना ही हकिकत सांगितली. ते म्हणाले, नदीपात्रात प्रेते जाळतात. त्या ठिकाणी देवचार घाबरवतो. हा क्षण आणि अमावस्या कधीच मी विसरणार नाही. परमेश्वराला माझे दंडवत.

♦

## सुविचार


**संत कबीर**

*सत्य बराबर तप नही। झूट बराबर पाप।*
*जाके हिरदे सच है। ताके हिरदे आप।।*

सत्यासारखं तप, पुण्य नाही. असत्यासारखं पाप नाही. ज्याच्या हृदयात सत्य असतं त्याच्या हृदयात परमशक्ती वास करते.

# भावपूर्ण श्रद्धांजली

◆ श्री. उदय दत्तात्रेय मराठे, मुलूंड भ्रमणध्वनी : ९८९२२६५६४४



**जलतरणपटू कै. श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे**

**मा**झे वडील श्री. दत्तात्रय आत्माराम मराठे, आम्ही त्यांना 'तात्या' म्हणत असू. शांत स्वभाव, मितभाषी व सदैव हसतमुख असे व्यक्तीमत्त्व. व्यवसाय व नोकरीच्या निमित्ताने परिभ्रमण हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. त्यांनी खूप सोसले, त्याग केला व पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायक कार्य करून ठेवले.

आपल्याला जे काही करावयाचे राहिले ते आपण निवृत्तीनंतर का होईना पण सुरू करायचे. निवृत्तीनंतर काय करावे हा प्रश्नच पडला नाही.

लहानपणापासून पेटी वाजवायची आवड होती. बुद्धीबळ कॅरम व पत्ते ह्यासारख्या बैठ्या खेळांमध्ये रस होता. ज्येष्ठ नागरिकांसाठी डोंबिवली स्थित्य 'सन्मित्र मंडळ ब्रीज क्लब'चे ते सभासद होते. त्यांच्या ९० वर्षापर्यंत नियमित खेळावयास जात होते. समवयस्क मित्रांसमवेत ते वेगळाच अनुभव व आनंद घेत होते. त्यांच्या वयाच्या ८८व्या वर्षी डोंबिवली येथे आयोजित खुल्या ब्रिज स्पर्धेत श्री. बापट ह्यांच्या पार्टनरशिपमध्ये त्यांची टीम प्रथम क्रमांक पटकावून विजयी झाली.

वाढदिवस साजरा करण्यामध्ये त्यांचा उत्साह दांडगा असायचा. सर्वांच्या लक्षात राहणारे म्हणजे त्यांची षष्ट्याब्दीपूर्ती, पंच्याहत्तरी व सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा. घरच्या मंडळींसमवेत, नातलग व मित्रपरिवाराने हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली होती. इतरही शुभकार्यात उदा. लग्न, मुंज, पूजा व इतर धार्मिक कार्य, त्यांची उपस्थिती आवर्जून असायची.

सर्वात जास्त जोपासलेला छंद म्हणजे जलतरण (Swimming) माझ्या मुलीला कु. अल्पनाला पोहावयास शिकवायचे म्हणून कालिदास नाट्यमंदीराजवळ स्थित्य जलतरण तलावाचे ते सभासद झाले. ते शेवटपर्यंत त्यांनी खूप मुलांना शिकवले. त्यामध्ये अपंग व मतीमंद मुलांचा सुद्धा समावेश आहे. त्यांना जलतरणचा खूप फायदा झाला.

जलतरण शिकावयास येणारी मुले, त्यांचे पालक, तसेच पोहायला येणारे डॉक्टर्स, इंजिनीयर, व्यावसायिक, नोकरदार वर्ग अशा सर्व स्तरांतील व्यक्तींशी मैत्री झाली. त्यामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. मुलुंड येथे आयोजित खुल्या तरणतलाव स्पर्धेतील विजेत्यांना त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

"Summary of my swimming life" from 1989 to 2014 असे पुस्तक तयार केले. पुस्तकातील काही पानांच्या प्रती काढून, संच बनवले.एखाद्या कार्यक्रमाचे औचित्य साधून खास व्यक्तींना त्यांची आठवण म्हणून भेट स्वरूपात प्रदान केल्या. विविध स्पर्धेत त्यांनी बरीच पदके पटकावली.

१. राष्ट्र स्तरीय, राज्य स्तरीय, ज्येष्ठ नागरिकांसाठी व इतर खुल्या स्पर्धेमध्ये एकूण ९ पदके (सुवर्ण, रजत व कास्य) पटकावली.

२. MIG Cricket Club तर्फे ज्येष्ठ जलतरणपटू म्हणून मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

३. Rotary Club of Thane Uptown तर्फे "Vocational Excellence Award" ने सन्मानित केले.

४. 'हितगुज'ने विशेष पुरस्कार देऊन गौरव केला.

Harmony मासिकाने त्यांच्या यशाची दखल घेऊन जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहचवण्याची तसदी घेतली. हितगुजने सुद्धा वेळोवेळी त्यांचे कौतुक केले. मराठी, गुजराथी व इंग्रजी वृत्तपत्रांनी फोटोसहीत भरपूर प्रसिद्धी दिली.

मराठे प्रतिष्ठानबद्दल वेगळीच Attachment होती. वार्षिक संमेलन, वार्षिक सभा अशा कार्यक्रमात त्यांची उपस्थिती असायची. कार्यकारी मंडळाने देखील त्यांचा उचित सत्कार केला. तसेच गुणवान विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करावयाची संधी दिली. आम्ही सर्व मराठे प्रतिष्ठानचे आभारी आहोत. प्रतिष्ठानच्या कार्यक्रमानंतर तृप्त मनाने घरी येत असत. त्यांचा आनंदी चेहरा बरच काही सांगून जायचा.

हितगुजला देणगी दिली. वनवासी कल्याण आश्रमास दिवाळीच्या सुमारास देणगी देत असत. जमेल तसे जमेल तेवढे देतच राहिले. अगदी हिशेब न ठेवता. त्यामुळे काही करावयाचे राहिले आहे अशी भावनाच उरली नाही.

२२ जून २०१८ रोजी आपल्या सर्वांचा अखेरचा निरोप घेतला. पुढील प्रवास निश्चितच सुखदायी असेल यात शंका नाही.

◆

# सहवेदना

सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व) येथील रहिवाशी उर्मिला लक्ष्मण मराठे (पृ. ५२०) यांचे अल्पशा आजाराने १ जुलै २०१८ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

कै. उर्मिलाताई या हितगुजचे भूतपूर्व संपादक कै. श्री. लक्ष्मणराव यांच्या पत्नी होत्या. मराठे प्रतिष्ठानच्या बैठकींना बरेचदा त्या उपस्थित राहात. गोवा-बिंबल येथील संमेलनात त्यांचा सक्रीय सहभाग होता. कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला त्यांनी धैर्याने तोंड दिले. लक्ष्मणरावांनी त्यांची मनोभावे सेवा केली, औषधोपचार, पथ्यपाणी सर्व काही सांभाळले. त्यांना या जीवघेण्या दुखण्यातून बाहेर काढण्याचे श्रेय त्यांनी लक्ष्मणरावांना दिले होते. परंतु दुर्दैवाने लक्ष्मणरावांचे निधन झाल्यामुळे त्या दुःखी झाल्या. मनाने खचल्या. पती निधनाचा आघात त्यांना सोसावा लागला. आणि अखेर त्याही हे जग सोडून गेल्या.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. उर्मिला लक्ष्मण मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

कै. मुकुंद सीताराम मराठे यांचे दि. १४ ऑगस्ट २०१८ ला पुणे येथील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेच्या कार्यकारिणीत ते अनेक वर्षे सदस्य होते. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाला मुकुंदरावांची हजेरी नाही, असे कधीच होत नसे. कार्यक्रमांना येणाऱ्या सर्व कुलबांधव भगिनींचे ते हसतमुखाने स्वागत करीत. प्रतिष्ठानच्या सभांना, कार्यक्रमांना, संमेलनांना कै. मुकुंदरावांची आवर्जून उपस्थिती असे. प्रतिष्ठानचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीही कामाला ते सदा तत्पर असत. धडपड्या कार्यकर्ता म्हणून पुणे प्रतिष्ठान कार्यकारिणीत त्यांची विशेष ओळख होती. कार्यक्रमांत उत्साहाने सहभागी होत असत. कोण 'मराठे' कोठे राहतो ते घर त्यांना माहीत असायचे, नवीन कोणी कुलबांधव आला तर त्याचेही घर-पत्ता शोधून काढायचे. काही अडले तर, ''मुकुंदरावांना विचारा ते सांगतील, त्यांना बरोबर माहीत असेल'', असे त्यांच्याविषयी बोलले जायचे जणु काही मुकुंदराव म्हणजे चालता-बोलता कोशच. अलीकडे मात्र आजारपणामुळे ते कार्यक्रमांना येऊ शकत नव्हते. मराठे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. विजय मराठे हे मुकुंदरावांच्या 'चाणाक्षपणा' या गुणाचा नेहमी कौतुकाने उल्लेख करीत. त्यांच्या जाण्याने मराठे प्रतिष्ठान एका धडपड्या, उत्साही कार्यकर्त्याला मुकले आहे असे खेदाने नमूद करावेसे वाटते. आता ते कार्यक्रमांत दिसणार नाहीत याचे वाईट वाटते. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. मुकुंदराव मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

दि. २७ जुलै २०१८ ला आपले कुलबांधव डॉ. शरश्चंद्र दत्तात्रेय मराठे (पृ. ४१७) यांचे दुःखद निधन पुणे येथे राहत्या घरी वार्धक्यामुळे झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी श्रीमती उषावहिनी, तीन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. श्री. सदानंद मराठे (बांद्रे) यांचे ते चुलतभाऊ होते.

डॉ. शरदश्चंद्र मराठे हे विख्यात ॲनास्थॅस्टिट म्हणजे भूलतज्ज्ञ डॉक्टर होते. मराठे प्रतिष्ठानशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आत्मार्पण केले त्या प्रायोपवेशनाच्या काळात स्वातंत्र्यवीरांची प्रकृती पाहाण्यासाठी जे डॉक्टर्स नियुक्त केले होते त्यात डॉ. शरदचंद्र मराठे यांचा समावेश होता. याविषयी स्वातंत्र्यवीरांच्या अखेरच्या दिवसातील आठवणी वजा त्यांचा एक लेख 'स्वातंत्र्यवीर सावरकर एक आठवण' हा लेख 'हितगुज' जून २००८च्या अंकात प्रकाशित केला होता.

कै. डॉ. शरदचंद्र दत्तात्रेय मराठे यांना मराठे प्रतिष्ठानद्वारा भावपूर्ण श्रद्धांजली.

कै. मदन (मधू) रामचंद्र मराठे यांचे दि. २१ जून २०१८ ला दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मेधा, मुलगे - नीलेश, शैलेश, सूना - सौ. प्रांजली, सौ. शमिका, भाऊ नंदकिशोर, भावजय सौ. अमिता, पुतण्या मंदार, पुतणी नीता असा मराठे परिवार आहे. भटवाडी वेंगुर्ले येथे ते राहात होते. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. मदन रामचंद्र मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# अवघे पाउणशे वयमान

(अमृतमहोत्सव)

• मोरेश्वर ल. मराठे, सांगली भ्रमणध्वनी – ९४२२४२०६६९

**मा**झ्या वयाला २/२/१८ रोजी ७५ वे लागले. त्या आनंदाप्रित्यर्थ माझ्या मित्रमंडळींना व नातेवाइकांना मिष्ठान भोजन द्यावे असा विचार दिवाळी १७च्या सुमारास माझ्या मनात आला व तो मी माझा मुलगा चि. मनिष व सुन पल्लवी यांच्यासमोर बोलून दाखविला व त्यावर नुसते भोजन नको तर धार्मिक विधी पण करावा अशी पुष्ठी जोडली, त्यापुढे जाऊन सुनबाईने प्रस्ताव मांडला की, यानिमित्त नातेवाईकाना भेटवस्तू द्यावी. यास सर्वांची संमती मिळताच विचाराला गती मिळाली. व कार्यक्रम पक्का झाला. आमच्या सुनबई 'टप्परवेअर'च्या एजंट आहेत. त्यामुळे ½ ली. बाटलीचे जोड असे १०० पॅक विकत घेतले. माझा जो मित्र वर्ग आहे त्याना सुवासिक उदबत्तीचा मोठा पुडा प्रत्येकी भेट देण्याचे ठरले. त्याप्रमाणे ११० पुडे विकत आणले.

दि. ४/३/१८ रोजी वाडीकर मंगल कार्यालयात माझ्या पंचाहत्तरीचा कार्यक्रम ठरला. दि ३/३/१८च्या संध्याकाळपासूनच परगावचे व सांगलीतील नातेवाईक कार्यालयांत जमा झाले. चिं. मनिषने रात्रीच्या जेवणासाठी आधूनिक काळास योग्य 'फास्ट फूड' पदार्थांचा मेनू ठरविला होता. दुसरे दिवशी सकाळी ९ वा. पासूनच कार्यक्रमाची गडबड सुरू झाली. नाष्ट्यासाठी रूचकर आप्या–चटणीचा बेत होता. सकाळी १०.३० वा. पासून श्री. छत्रे गुरूजी (पूणे) यांनी धार्मिक विधी माझ्याकडून करवून घेण्यास सुरुवात केली. साधारण १.३०वा. विधी संपन्न झाल्यानंतर साखरेची तुला करून ६३ की. साखर दोन वृद्धाश्रमाना दान केली.

धार्मिक विधी व्यवस्थित पार पडल्याने मनाला सात्विक समाधान व प्रसन्नपणा लाभला. आहेर न घेण्याचे ठरवून सुद्धा सर्वांचा आग्रहखातर तो घ्यावाच लागला. जुने मित्र व नातेवाईकांच्या उपस्थितीमुळे खुपच मानसिक समाधान लाभले. सर्वांबरोबर फोटोंचा कार्यक्रम व उपस्थितांना मिष्ठान्न भोजन, भेट वस्तू देणे घेणे इ. नंतर निरोपाने कार्यक्रमाची सांगता झाली. परमेश्वराकडे कृतज्ञता व्यक्त करून मी या लेखाचीही सांगता करतो. ♦

---

## मागणे

बोल बोल रे गणराया
सुखी मी ठेवीन सकलाया।।धृ।।

चंदनी चौरंग बनविला
सभोवति दीपांच्या माला
फुलांचा आरास मी केला
तयामध्ये गणपती बसविला।।१।।

अंगावर घातला शेला
शिरी मी मुकुट चढविला
गळ्यामध्ये सोनिया कंठी
हस्तकी बिंदल्या घातल्या।।२।।

स्वहस्ते बनविल्या वाती
तयाच्या लाविल्या ज्योती
मोत्यांचा हार बनविला
गळा मी तुझिया घातला।।३।।

सुग्रास भोजन भोगाला
केशरी पाणी प्यायाला
प्रसादा मोदक बनविला
रुपेरी ताटी वाढीला।।४।।

मुखी तू घास घे आता
ठेविते चरणी तुझ्या माथा
लवकरी ये रे गणराया
वाट मी पहाते रे सखया।।५।।

सुबुद्धि दे रे आम्हाला
संकटे हरिसी क्षणाला
आहेस बुद्धिचा दाता
बोर रे बोल तू आता।।६।।

**– संजीवनी राजाराम विलणकर**, रत्नागिरी
(९४२१२३३६२४)

## माझी कविता

चिकण माती, चिकण माती
गोळा जो बनवला
गोळा जो बनवला मी कुंभाराकडे दिला
कुंभाराकडे दिला त्याने मडका जो बनवला
मडका जो बनवला तो मज हाती दियेला
मज हाती दिला तो मी काठावर ठेवला
काठावर ठेवला तो मी नदीत बुडवला
नदीत बुडवला अन् पाण्याने भरला
पाण्याने भरला अन् अंगणात शिंपला
अंगणात शिंपला अन् रांगोळ्याने सजवला
रांगोळ्याने सजवला वर गोपाळकृष्ण ठेवला
गोपाळकृष्ण ठेवला अन् फुलानी सजविला
फुलानी सजवला अन् बाळकृष्ण हसला
बाळकृष्ण हसला अन् राधामाई फसली
फसली ती फसली अन् चरणाशी विसावली

कवि – **मोरेश्वर ल. मराठे**, सांगली (९४२२४२०६६९)

# श्री. अप्पा व सौ. पद्मजा खांबेटे यांच्या विवाहाचा हीरक महोत्सवी सोहळा




डॉ. मधूसुदन खांबेटे (पृ. ६९६) संस्थापक अध्यक्ष ठाणे लघु उद्योग संघटना यांचा ८७ वा वाढदिवस व लग्नाची ६० वर्षे (हीरक महोत्सव) पूर्ण झाल्या बद्दल एक छोटेखानी कार्यक्रम शहनाई हॉल येथे १३ मे २०१८ रोजी आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात अपूर्वा इनामदार हिने सादर केलेल्या गणेश वंदनेने झाली. सदर कार्यक्रमात ठाण्याचे खासदार श्री राजन विचारे, श्री संदीप लेले तसेच अनेक प्रतिथयश उद्योजक, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व सन्माननीय पत्रकार व आप्तेष्ट मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सुमारे तीनशे पेक्षा जास्त लोक कार्यक्रमास उपस्थित होते.

डॉ.श्री मधू खांबेटे व पद्मातांई खांबेटे यांच्या सहजीवनावर प्रकट मुलाखत श्रीमती संपदा वागळे यांनी घेतली. मुलाखती दरम्यान प्रसंगानुसार अंजली कानविंदे व संजय पडवळ यांनी सगीतमय कार्यक्रम सादर केला.

ॲड. हर्षवर्धन खांबेटे यांनी सुद्धा अनुभव कथन केला.

श्री पुरुषोत्तम आगवण व ॲड. संजय द्विवेदी यांनी डॉ अप्पा खांबेटे व पद्माताईच्या सहजीवनावर सुंदर काव्य सादर केले.

---

# सहकाराचा चेहरा

**भा**रतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळावर नेमणूक झालेले सतीश मराठे हे अर्थविषयक सहकार क्षेत्रातील 'सहकार भारती' या संस्थेचे प्रणेते आणि बँकिंग क्षेत्रात दीर्घकाळ काम केलेले ज्येष्ठ बँकर आहेत. त्यांचा जन्म १ फेब्रुवारी १९५०चा. 'सहकार भारती'ची स्थापना झाली तेव्हा ते अवघे २९ वर्षांचे होते. ते या संस्थेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. पुढे त्यांनी सहा वर्षे त्याचे अध्यक्षपद भूषविले. सहकार भारतीला नावारूपास आणण्यात इतरांच्या जोडीने त्यांचा सिंहाचा वाटा वाटा आहे. सहकार भारतीचा आता भारतभर विस्तार झाला असून सध्या वीस हजारांहून अधिक सहकारी संस्था सहकार भारतीशी जोडल्या गेल्या आहेत. सहकार क्षेत्रात काम करणारी ही देशातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था बनली आहे. 'सहकारिता रत्न' पुरस्काराने सन्मानित मराठे यांनी बँकिंगची कारकीर्द 'बँक ऑफ इंडिया' मधून सुरू केली. पुढे ते 'द युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड'चे अध्यक्ष बनले. नंतर 'जनकल्याण सहकारी बँके'चे मुख्य कार्यकारी अधिकारी बनले. त्यांच्या कारकीर्दीत या बँकेने सलग दहा वर्षे वार्षिक २५ टक्के वाढ करून दाखवली. त्यांची संपूर्ण कारकीर्द बँकिंग क्षेत्रातील असली तरी त्यांनी कामाचा आरंभ पत्रकार म्हणून केला. मुंबई विद्यापीठात वाणिज्य व कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी 'भारतीय विद्या भवन'मधून पत्रकारितेची पदविका घेतली. यावेळी, बातमीदारीत सुवर्णपदक मिळविले. विद्यार्थी जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करताना ते 'छात्र शक्ती' या विद्यार्थ्यांच्या जीवनाशी आणि शिक्षणाशी निगडीत नियतकालिकाचे संपादन करीत. त्यांच्या या नव्या नेमणुकीमुळे देशाच्या शिखर बँकेच्या व्यासपीठावर सध्या अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या सहकारी बँकांची कैफियत जोरकसपणे मांडली जाईल, ही अपेक्षा आहे.

**– सतीश मराठे** (पृ. १२९)

*म.टा. वरून साभार, दि. ९ ऑगस्ट २०१८*

## सुविचार

**म. फुले**

जशी ज्यांची कर्मे। तशी फळ देती।
वळण लाविती। संतानास।
दुष्ट कर्मे तुम्ही। अजिबात टाळा।
पुढे नाही धोका। मुलांबाळा।।

# बंदी - नाथाभाऊ साईनाथ

• श्री. अच्युत म. चक्रदेव (पृ. ७३२), पुणे भ्रमणध्वनी – ९६२३५५०६३३

**ही** गोष्ट साधारण १९५९-६० मधील. कारागृहखात्यात मी नव्यानेच रुजू झालो होतो. कारागृहातील सर्वच कामाची मला माहिती नव्हती, म्हणून मला माझे अधिकारी कारागृहातील नित्य फेरीस घेऊन जात. कारागृहात जुन्या पद्धतीप्रमाणे एकूण तीन मंडले होती. त्या प्रत्येक मंडलात ३-३ मोठ्या बराकी व १०-१० लहान कोठड्या होत्या. एके दिवशी असाच नित्यफेरीस गेलो असता. मंडल क्र. ३ मध्ये एका कोठडीत थोडी वृद्धत्वाकडे झुकलेली एक व्यक्ती मला दिसली ती व्यक्ती सकाळची वेळ असल्यामुळे. स्नान वगैरे आटोपून कोपऱ्यात, एका चौरंगासारखे आसन ठेवून पूजेत मग्न दिसली. समोर श्रीगुरुदेव दत्तांचा फोटो फ्रेम होता. हीच व्यक्ती म्हणजे बंदी नाथाभाऊ साईनाथ, कपाळावर ठसठशीत गंध लावलेला. आणि इतरत्र गंध, बुक्का इ. टीळे लावलेले. पाहताच क्षणी आदर वाटावा असे व्यक्तीमत्त्व. या वयात या आदरणीय व्यक्तीने काय गुन्हा केला असावा? माझे मनात असे अनेक प्रश्न निर्माण झाले. तस पाहिल तर यांना काहीच कमी नव्हतं, तसे नाथाभाऊ ४-५ सहकारी संस्थेचे अध्यक्ष होते. स्वतःचे मालकीचे गावात एक मोठे दत्त मंदिर होते मग...

अशाच या संस्थांमधून त्याचे कडे सही घेण्यासाठी ‘संस्थेचे चिटणीस, इतर पदाधिकारी येत, नेहमीच ते येत असल्यामुळे नाथाभाऊंच्या मनात चांगलाच विश्वास निर्माण केला होता. एकदा अशाच एका संस्थेचे चिटणिसाने नाथाभाऊंची सही चेकवर घेतली. नेहमीप्रमाणे मजकूर पुरेसा न वाचताच नाथाभाऊंनी चेक वर सही केली, आणि त्यामुळेच सर्व रामायण घडले. त्या चिटणिसाने संस्थेच्या कारभारात बनावट रक्कम घालून अपहार केला होता. आणि तो उघडकीस येऊन गुन्हा ठरला. आणि चिटणिसाला त्यात सात वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली. आणि नियमाप्रमाणे मजकूर वाचूनच अध्यक्षाने सही करणे आवश्यक होते. त्यांनी चिटणिसांवर अंध विश्वास ठेवून सही केली. ही त्यांची कृती बेकायदेशीर ठरली. विश्वास असल्यामुळे त्यांचे वरही ती जबाबदारी आली. आणि नकळत का होईना नाथाभाऊंच्या हातून गुन्हा घडला. परंतु अनेक साक्षीदारांनी नाथाभाऊंची नैतीक बाजू उचलून धरल्यामुळे. न्यायाधीशांचे मनात त्यांचे वय, तसेच इतर साक्षीदारांचे अनुभव, नाथाभाऊंची धार्मिक कार्यासाठी दिलेल्या देणग्यां लक्षात घेऊन, सहानुभूतीने केवळ आंधळे पणाने सही करण्याचे गुन्ह्यास्तव ३ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा दिली. आणि कधीही हयातीत पोलीस स्टेशन न पाहणारे नाथाभाऊ ती शिक्षा भोगत आहेत.

**दैवदुर्विलास दुसरे काय?**

परंतु कारागृहात आल्यावरही आपल्याला दिलेले धान्य निवडण्याचे काम सांभाळून ते दत्तभक्ती करीत राहिले. प्रत्यक्ष कोठडीतही सकाळ सायंकाळी श्री दत्तात्रयांची आरती चाले. कारागृहातील उपहारगृहातून कुपनावर ते काहीतरी घेऊन सर्वांना प्रसाद म्हणून वाटीत असत. तिथेच शिक्षा भोगत असलेल्या चिटणिसाला बोलावून घेऊन ते म्हणाले सुद्धा. ‘अरे तुला पाहिजे असलेली रक्कम मला वेळेवर मागून घेतली असतीस तरी मी तुला ती दिली असती. पण नियती पुढे कोणाचे काय चालणार? हेच खरे. चिटणिसाला झालेल्या दंडाची शिक्षेची रक्कमही नाथाभाऊंनी भरून त्याची सुटका व्हायला मदत केली.

नाथाभाऊंनी नाट्यसंगीताचीही आवड होती. मुक्तते नंतर त्यांनी श्री दत्तात्रयांची जयंती वेळी प्रख्यात गायक बालगंधर्वांची मैफल ठेवली होती. गोहरजानही होत्या, माझी नाट्यसंगीताची आवड लक्षात घेऊन नाथाभाऊंनी मला ही रीतसर आमंत्रण दिले होते. मी व आमचे त्यावेळचे सहकारी अधिक्षक दोघेही गाण्याचे कार्यक्रमास गेलो होतो.

अशी ही नाथाभाऊंची कहाणी... ♦

---

## शांत सागरीं कशास उठविलीस वादळें?

कवियित्री : सौ. संजीवनी मराठे

शांत सागरीं कशास, उठविलींस वादळें?
गाइलें तुझं कशास, गीत मन्मनांतलें? ।।ध्रु.।।

काय हें तुझ्यामुळे, देहभान हरपलें
युगसमान भासतात, आज नाचरीं पळें!।।१।।

अमृत-मधुर बोल एक, श्रवणि जो न पाडिलास
अधिरता भरे जिवांत, केवढी तयामुळें?।।२।।

स्वर्ग कल्पनेतला, येईल कधी भूतला
दिवस-रात्र अंतरात, आस ही उचंबळे! ।।३।।

गायिका : सौ. कांचनमाला बडे H.M.V.No. N. 15188

*गुलदस्ता - श्री. जयंत वि. कुलकर्णी, अनघा प्रकाशन, ठाणे या पुस्तकातून*

*प्रेषक - श्री. का बा. मराठे (पृ. ५४१), गोवा*

# भगवतगीतेची उर्दूशायरी

• श्री. सदाशिव बळवंत मराठे, (पृ. ३८०), बडोदे दूरध्वनी - ०२६५-२४२३०५५

**भ**गवतगीता हा धर्मग्रंथ/प्रश्नोत्तरीला - हिंदू धर्मीय समाज जरी ह्याला धर्मग्रंथ मानत असला तरी कित्येक अ-हिंदू लेखक व कवीनीही त्याचा अभ्यास खोल जावून केला आहे. दूरदर्शनवर प्रसारीत झालेल्या मालिकेचे लेखक व पटकथाकार ही श्री. मासूम रझा होते. सर्वांनाच गीतेने आकर्षिले आहे.

नुकत्याच वाचनात आलेल्या एका लेखामुळे त्याचे महत्त्व व मर्म वाढले ह्याचे खास कारण म्हणजे त्यात गीतेचे आकर्षण असलेल्या विद्वान व वैज्ञानिकाचाचा उल्लेख होता. त्यात वॉरन हेस्टिंग्स, दारा शिकोह, टी.एस. एलियट व आईनस्टाईन वगैरेची नावे मुख्य आहेत. त्यात आईनस्टाईन म्हणतो ''माझा वैज्ञानिक शोध व त्याच्या प्राथमिक रचना ह्या सर्व माझ्या गीतेच्या संस्कृत साहित्यामुळेच सहज सफळ झाल्या.

तसेच उर्दू शायर अनवर जलालपूरी ह्यांनी गीतेला शायरी रूपाने नटवून त्यांचा गीताज्ञान भक्ति समाजापुढे प्रसुत केली आहे. ह्याबद्दल कवीच्या त्या त्या धार्मिक अनुयायांबरोबर हिंदुनीही त्याचे काव्य/शायरी उचलून धरली व त्याला न्याय दिला.

उदाहरणार्थ :- उर्दू कवि लिहितो :

धृतराष्ट्र आँखोसे महरून या। जमगर ये न समझो के मासूम था।।
उन्हे भी ख्वाहिश थी की दुनिया है क्या? अंधेरा है क्या उजाला है क्या।।
वह एक शख्स 'संजय' पडावाय। वही उनसे आखिर हुआ हर कलाम।।
उसे रबने ऐसी नजर बक्षही। कि बिन देखे उसने हर एक यश देख ली।।
धृतराष्ट्र राजाभी ये व्याप भी। समझते ये पुण्यभी पाप भी।।
महोब्बतसे बटौंकी सरसार थे। अजब उनके भी वो किरतार थे।।
उन्हेभी ख्वाहिश थी सब जान लूं। सभी लढनेवालों को पहचान लूं।।
कहानी तो संजय बताता रहा। है मैदान में क्या वो सुनाता रहा।।
मैदान तो था जंग ही के लिये। वहीसे जले धर्मके ही दिये।।

उर्दू कवि पुढे म्हणतो 'गीते'ची हीच महानता आहे की त्यांत सागितले जाते की 'शांति तेथेच असते जिथे युद्ध होते.' तसेच प्रेमहि लढल्या-झगडल्या शिवाय अनुभवास येत नाही. अनेक वर्षापासून तर्क केल्याशिवाय कुणीही मानण्यास तयार नसतो. आणि गीतेत तेच अर्जूनाने जोपासले आहे. आणि श्रीकृष्णापुढेही तर्क मांडले. अर्जूनाजवळ स्वतंत्र तर्क करण्याची बुद्धी नसती तर मानवजातीला 'गीता' प्राप्त झाली नसती. तरीही अर्जून माधवाला विचारू शकला असता की, ''माधवा तू मला युद्ध करण्यास आग्रह करीत होतास मग तू युद्धभूमी सोडून का पळालास?'' पण ह्याला कदाचित माधवानी उत्तर दिले असते की, ''हे पार्थ, ती समय परिस्थितीची गरज होती. कारण जरासंध मथुरेस जावून बलरामला व मला मथुरा सोडून पळविण्याची संधि पहात होता.'' हा तर्क कुणाचा? पार्थाचा कि माधवाचा?

गीतेच्या संदेशाचे मर्म ग्रहण करणाऱ्या ह्या मुसलमान गीताभक्ताने मिळविलेली सफलता खरंच कौतुकास्पद आहे कारण शेवटी तो म्हणतो ''गीताकी यही महानता है की मैदाने जंगमेही अमनकी फसल पैदा करती रही और बताया गया की शांति वहा होती हे जहां जंग हो रही है, प्रेमकी बात वही होती है जहां लडाई हो रही हो.''

शेवटी : असेही वाचण्याच आले की भारताच्या फाळणीपूर्वी लाहोर शहरात सत्यनारायणाची कथा/पूजा उर्दू भाषेत सांगितली जात असे. ♦

## वाचकांचा पत्रव्यवहार

**डॉ. सौ. सुमेधा मराठे,**
संपादिका 'हितगुज' मुंबई

**विषय : सद्‌गुण विकृती**

महोदया,

'सद्‌गुण विकृती' हा आपला संकलनात्मक लेख 'समस्त हिंदू समाजाला' आत्मचिंतन करायला लावणारा आहे.

'तोड, मोड, फोड' ही मुस्लीम संस्कृती 'मूर्तिभंजन', सक्तीचे धर्मांतर एवढेच करून थांबत नाही तर - पूर्वीची प्रसिद्ध नगरांची नावेही त्यांनी बदलली आहेत.

उदा. इंद्रप्रस्थ देहली, खडकेश्वर तथा खडकी - औरंगाबाद

वस्तूतः औरंगजेबाने धर्मवीर संभाजीराजांना एवढे शारिरीक, मानसिक हालहाल करून ठार मारले आहे की, त्या शहराचे 'संभाजीनगर' नाव हवे. पण अजुनही 'औरंगाबाद' हेच नाव महाराष्ट्राचे छाताडावर नाचवत आहेत. धिःकार आमचा आम्हालाच!

पुण्यावर २-४ दिवस मोगली सत्ता आली होती. तेवढ्यात त्यांनी पुण्याचे नाव 'मोमिनाबाद' असे काहीतरी ठेवले होते. पण पहिल्या बाजीरावांनी ते बदलून पुन्हा पुण्यनगरी असे राखले. प्रयाग - अलाहाबाद, उस्मानाबाद इ. अनेक अशी बदललेली नावे आहेत. केव्हा होणार ही कार्यवाही?

आपला
**अच्युत म. चक्रदेव** (पृ. ७३२), पुणे

# पहिल्या बक्षिसाचा आनंद

◆ गीता गोविंद मराठे (पृ. ५४१), गोवा

**मा**णसाच्या जीवन प्रवासात अनेक सुखद दुःखद प्रसंग येतात. सुखाच्या प्रसंगाची नेहमी आठवण येत असते. दुःखाचे प्रसंग माणूस विसरत असतो. जीवन हे ऊन-पावसासारखे असते. 'गोमन्तक'ने आपल्या आठवणी जागृत करण्याचे काम केले आहे. याबद्दल तिळमात्र शंका नाही. माझ्या संसारातील असाच एक आनंदाचा क्षण मला मिळाला तो म्हणजे 'गोमन्तक पुरस्कृत पहिल्या बक्षिसाचा आनंद. त्याचे वर्णन कोणत्या शब्दांनी करावे, हेच कळेनासे झाले आहे. माझ्या लेखनाचा हाच एकमेव प्रयत्न आहे. माझे मिस्टर व दोन अपत्ये सौ. गंधाली व चि. अमित यांच्यासह श्री समर्थ सदन तिस्क (फोंडा) येथे राहायला आलो. त्याला आज अठरा वर्षे झाली. बारा वर्षांपूर्वी मुलीचे लग्न झाले व गेल्या सहा वर्षांपूर्वी मुलाचे लग्न झाले. त्याच वेळचा हा पहिल्या बक्षिसाचा आनंद आहे. सहा वर्षांपूर्वी गोमंतकने जाहीर स्पर्धा आयोजित केली होती. लाखोंच्या निरनिराळ्या संसारोपयोगी वस्तू व संसाराचा गाडा चालविण्यासाठी स्कूटर वगैरे अट एकच होती. दै. 'गोमन्तक'मधली शंभर कुपन तक्त्यावर चिकटवायची व पाठवायची. झाले मी कामाला लागले. शंभर कुपने जमवली. फोंडा कार्यालयात सादर केली. मनात अपेक्षा नव्हती. हा केवळ पहिला प्रयत्न होता. मी अनेक उदाहरणे पाहिली आहेत. पैशांकडे पैसा जातो. बक्षिसे त्यांनाच मिळतात. पण सामान्य माणसाकडे ही परमेश्वर पाहतो. देवाच्या घरी देर आहे, पण अंधेर नाही. झाले एकदाचा तो निकालाचा दिवस उजाडला. 'गोमन्तक'मधून तालुकावार बक्षिसाचे व विजेत्यांची नावे झळकली. आमचे तिस्कावर मराठे फर्निचर नावाचे दुकान होते. ते मिस्टर चालवीत असत. सकाळचे दहा वाजले. दुकानासमोरून आमच्या परिचयाचा आनंद जोग नावाचा मुलगा दुकानात आला व मिस्टरांना म्हणाला गुरुजी पार्टी हवी. मी पाहातच राहिले. कशाबद्दल पार्टी? अहो, तुमच्या मंडळींना फोंडा तालुक्यातील स्कूटरचे पहिले बक्षीस लागले आहे. हे पळतच पेपरच्या दुकानावर गेले. बघतात तर काय, मला खरोखरच स्कूटरचं बक्षिस मिळालं होतं. पेपर आणून मला दाखवला. मी देवाचे व दैवाचे आभार मानले. मी म्हटलं, अहो येणाऱ्या सुनबाईचा हा पायगुण आहे. कारण पुढच्याच महिन्यांत मुलाचे लग्न ठरले होते. मी मडगावातून नवीन पहिली वहिली स्कूटर आणली व मनोमन ठरवून टाकले. नव्या सुनेला ती द्यायची. आमच्या घराण्यात आज पावेतो कोणालाही स्कूटर मिळाली नाही. मी भाग्यवान समजते. मुलाचे लग्न झाले व स्कूटर सुनेच्या नावे सुद्धा केली. पुण्यात दिमाखात ती स्कूटर चालत आहे. चालत राहील. पहिल्या बक्षिसाचा आनंद वेगळाच असतो. 'गोमन्तक' दैनिकाने तो माझ्या पदरी घातला. याबद्दल 'गोमन्तक'ची मी सदैव ऋणी राहीन. ◆

---



## डॉ. वसुधा आपटे (विद्वांस) यांची माहिती

**डॉ**. वसुधा आपटे (विद्वांस) ह्या न्यायवैद्यक शास्त्र म्हणजे फॉरेन्सिक मेडिसिन ह्या कार्यक्षेत्रात गेली ४५ वर्षे कार्यरत आहेत. मुंबईतील टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय व नायर रुग्णालय येथे ३२ वर्षे व त्यानंतर सुरतच्या महापालिकेच्या नव्या वैद्यकीय महाविद्यालयात ३ वर्षे सेवा करून त्या निवृत्त झाल्या आहेत. ह्या प्रदीर्घ सेवाकाळापैकी २४ वर्षे त्या न्यायवैद्यक शास्त्राच्या प्राध्यापिका व विभागप्रमुख होत्या. ह्या दोन्ही महाविद्यालयांमध्ये त्यांनी न्यायवैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुविधा उपलब्ध करून दिली. शिवाय ह्या दोन्ही महाविद्यालयांमध्ये डॉ. आपटे ह्यांच्या पुढाकाराने वैद्यकीय अध्यापन प्रशिक्षण केंद्र स्थापन झाले आहे आणि त्यांनी शिबिरे घेतली आहेत.

M.B.B.S. झाल्यावर लगेच विवाह झाल्यामुळे, डॉ. आपटे ह्यांनी M.D. आणि LL.B. (G) ह्या पदव्या लग्नानंतर घरसंसार व नोकरी सांभाळून मिळवलेल्या आहेत.

डॉ. वसुधा आपटे ह्यांची कारकीर्द अनेक प्रकारे विशेष म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. न्यायवैद्यक शास्त्र ह्या पुरुषप्रधान कार्यक्षेत्रात त्या गेली ४५ वर्षे सातत्याने कार्यरत आहेत आणि त्या क्षेत्रात इतका प्रदीर्घ अनुभव असलेली स्त्री, उभ्या महाराष्ट्रात दुसरी कोणीही नाही. अखिल भारतात आजही ह्या क्षेत्रांत केवळ १४-१५च स्त्रिया आहेत. मुंबईतील कॉरोनर म्हणजे अपमृत्यूनिर्णेता ह्यांच्या कोर्टात, डेप्युटी कॉरोनर म्हणून नियुक्ती झालेली, त्या कोर्टाच्या १२५ वर्षाच्या इतिहासातील एकमेव स्त्री म्हणजे डॉ. वसुधा आपटे. महाराष्ट्र मेडिको-लिगल

ॲसोसिएशनच्या अध्यक्षपदी तसेच इंडियन ॲकॅडमी ऑफ फॉरेन्सिक मेडिसिन ह्या अखिल भारतीय संघटनेच्या अध्यक्षपदी विराजमान झालेली एकमेव स्त्री म्हणजे डॉ. वसुधा आपटे.

अनेक सभा-परिषदांमध्ये डॉ. आपटे ह्यांनी भाषणे केली आहेत. व अनेक परिषदांचे संयोजनही केलेले आहे. अनेक विद्यापीठांच्या M.B.B.S. आणि M.D. परिक्षांसाठी त्यांनी परीक्षक म्हणून काम केलेले आहे. पर्यावरण शास्त्र ह्या विषयातील B.E. परीक्षेसाठीही त्या परीक्षक होत्या. Medical Council of India तर्फे इन्स्पेक्टर म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. आजही काही प्रतिष्ठित संस्थांच्या विश्वस्तपदी त्या काम करत आहेत.

विद्यार्थी जीवनात वसुधाताईंना अनेक बक्षिसे मिळाली आहेत. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये त्यांनी बॅडमिंटन व टेनिकॉईटमध्ये कॉलेजचे प्रतिनिधित्व केले आहे. मेडिकल कॉलेजमध्ये असताना त्या ॲथलेटिकस्‌च्या चँपियनही होत्या.

दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवरील २५ कार्यक्रमात डॉ. आपटे सहभागी झालेल्या आहेत. त्यात कवीसंमेलनाचा कार्यक्रमही समाविष्ट आहे. त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. आकाशवाणीच्या विविध केंद्रावरही त्यांचे कार्यक्रम झाले आहेत. त्यांच्या अनेक मुलाखती फेमिना, माहेर, चतुरा, चतुरंग, हितगुज, माहेर, मेनका, विवेक, आम्ही पार्लेकर, खरेखुरे लीडर्स अशा मासिकांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. 'कदंब' दिवाळी अंकात प्रदीर्घ मुलाखत छापलेली आहे. 'उंच उंच झोका कर्तृत्वाचा', 'नाते जन्माचे', 'सकळजन' ह्या मुलाखत संग्रहातही त्यांच्या मुलाखती छापलेल्या आहेत.

नोकरीच्या काळात इंग्रजीत लिखाण केल्यावर त्यांनी निवृत्ती नंतर मराठीत २००हून अधिक लेख लिहिले आहेत. त्यात, न्यायवैद्यक शास्त्रावरील १३१ लेख आहेत. नुकतेच ते लेख 'गुन्हेगारांचा कर्दनकाळ - न्यायवैद्यक शास्त्र' ह्या पुस्तकात संकलित झाले आहेत. सामाजिक विषयांवरील ६९ लेखांचा संग्रही प्रकाशित होणार आहे.

डॉ. वसुधा आपटे ह्यांना अनेक कलांमध्ये रस आणि गती आहे. त्यांना पाककलेतही रूची आहे. आणि त्यांचे खास पदार्थही आहेत. सेवानिवृत्त झाल्यावर औपचारिक अध्यापन संपले असले तरीही त्या विविध विषयांवर सर्वसामान्यांसाठी व्याख्याने देऊन लोकशिक्षणाचे व प्रबोधनाचे कार्य करत आहेत.

न्यायवैद्यक शास्त्र हे अनोखे कार्यक्षेत्र चोखाळून त्यात केलेल्या प्रदीर्घ व उल्लेखनीय कार्यामुळे डॉ. वसुधाताईंना मिळालेले पुरस्कार -

- १९९५ मध्ये 'Woman of the year' American Biographic institute कडून
- १९९९ मध्ये 'Woman of the decade' & न्यायवैद्यक चिकित्सा रत्न पुरस्कार Medico-legal Society, New Delhi कडून
- २००१ मध्ये 'Woman of the millennium' & outstanding teacher आणि outstanding teacher award
- २००९ मध्ये मुंबई दूरदर्शन - सह्याद्री वाहिनीचा 'हिरकणी' पुरस्कार
- २०१० मध्ये 'जीवनगौरव प्रशस्तीपत्र'
- २०१३ मध्ये 'झी मराठी' वाहिनीचा 'उंच माझा झोका' पुरस्कार
- २०१७ मध्ये अखिल भारतीय चित्पावन ब्रा. महासंघातर्फे 'चित्पावन भूषण पुरस्कार'

असे विविध पुरस्कार डॉ. वसुधाताईंना मिळालेले आहेत.

सांप्रत डॉ. वसुधा आपटे मेडिको-लिगल कन्सलटंट म्हणून कार्यरत आहेत.

डॉ. वसुधा आपटे ह्यांनी लिहिलेल्या 'गुन्हेगारांचा कर्दनकाळ न्यायवैद्यक शास्त्र ह्या पुस्तकाला २०१८चा प्रथम क्रमांकाचा 'सुप्रभात साहित्य पुरस्कार' मिळाला आहे. नुकताच १५ ऑगस्ट २०१८ रोजी सुरत येथे वसुधाताईंना 'Noble Asian of the year 2018' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



केरळ मधील पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात प्रतिष्ठानचे पुणे येथील सभासद कर्नल (नि.) प्रमोदन मराठे यांच्या व 'Disaster Management and Research Foundation' या स्वयंसेवी संस्थेचा पुढाकार. चिंचवड येथील मुलांनी वह्या, पेन्स, स्केच पेन्स आदी वस्तू जमा करून व्यवस्थित pack करून वरील संस्थेकडे पाठवल्या. संस्थेचे कार्यकर्ते व स्वतः श्री. प्रमोदन यांनी अथक प्रयत्न करून सुमारे ७१ खोकी भरून ही सामग्री केरळमधील विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी दोन दिवसांपूर्वी रवाना केली.

श्री., प्रमोदन यांनी WhatsApp वर मदतीसाठी आवाहन करून मदत म्हणून देण्यायोग्य वस्तूंची यादीही दिली होती. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून नागपूर येथील कॉलेज विद्यार्थ्यांनी 'अग्निपंख फौंडेशन' ही संस्था स्थापन केली. या संस्थेद्वारे ६५ खोकी भरून वस्तू नागपूर मधील हवाईदलाच्या सुपूर्द केली जी केरळला रवानाही झाली. श्री. प्रमोदन यांचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या या समाजकार्यास शुभेच्छा.

## उद्योजकता पुरस्कार विजेते श्री. विनय मराठे



श्री. विनय मराठे यांचे वडील श्री. काकासाहेब मराठे यांनी 'महाराष्ट्र इंडस्ट्रीज डायरेक्टरी' ही कंपनी १९७३ साली सुरू केली. १९७३ ते १९८१ मध्ये ठाणे औद्योगिक परिसराच्या ६ औद्योगिक डायरेक्टरी प्रकाशित करण्यात आल्या. श्री. विनय मराठे हे मराठे इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे संस्थापक आहेत. महाराष्ट्र इंडस्ट्रीज डायरेक्टरी, गुजरात इंडस्ट्रीज डायरेक्टरी व महाटेक हे या कंपनीच्या उपशाखा आहेत.

१९८३ साली श्री. विनय मराठे यांनी टेक्सटाईल इंजिनीयरिंग पूर्ण करून या कंपनीत रूजू झाले. संपुर्ण महाराष्ट्राची पहिली औद्योगिक डायरेक्टरी १९८५ साली प्रकाशित झाली. श्री. विनय मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीने बऱ्याच वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती करत आजपर्यंत महाराष्ट्र इंडस्ट्रीज डायरेक्टरीच्या २४ व गुजरात इंडस्ट्रीज डायरेक्टरीच्या १५ आवृत्या प्रकाशित केल्या. पुस्तकाबरोबर कंपनीने डी.व्ही.डी. व्हर्जनसुद्धा प्रकाशित केले. २० वर्षा पूर्वी कंपनीने स्वतःचे संकेतस्थळ सुरू www.maharashtradirectory.com केले. सुरुवातीला ह्या संकेतस्थळाला ८ ते १० हजार लोक दर महिन्याला भेट देत असत व आज या संकेतस्थळावर २.५ कोटी पेक्षा जास्त लोकं भेट देतात. कंपनीकडे स्वतःचे अद्यावत ५ सर्वर असून ६००० पेक्षा अधिक संकेतस्थळे कंपनीने बनविली आहेत. Google या जगत मान्य सर्च इंजिनची जागतिक परीक्षा उत्तीर्ण करून कंपनीने google certified partner हा किताब मिळवला आहे. कंपनीची स्वतःची Software Division असून या अंतर्गत customised solutions दिली जातात. कंपनीची ठाणे, पुणे व अहमदाबाद येथे स्वतःची अद्यावत कार्यालये असून महाराष्ट्र व गुजरात मध्ये प्रत्येक मोठ्या शहरात प्रतिनिधी आहेत.

श्री. विनय मराठे ह्यांच्या दूरदृष्टीमुळे 'महाटेक' ह्या औद्योगिक प्रदर्शनाचा मार्ग प्रशस्थ झाला. अनेक लघु उद्योग विभागातील व्यावसायिकाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ह्या योग्य व्यासपीठाची निर्मिती २००४ साली केली. महाटेक या नावाने दरवर्षी औद्योगिक प्रदर्शन भरविले जाते. आजपर्यंत पुणे व मुंबई येथे १४ महाटेक प्रदर्शने भरविण्यात आली ज्या मध्ये देश विदेशातील अनेक कंपन्यांचा सहभाग असतो. महाटेक हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन आहे. मराठे इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला २००९ पासून ISO 9001 : 2008 हे गुणवत्ता प्रमाण पत्र मिळाले आहे.

श्री. विनय मराठे ह्यांना २०१३ साली भारती विद्यापीठातर्फे एक उत्कृष्ट उद्योजक ह्या नात्याने भारतीय व्यवस्थेच्या वाढीसाठी केलेल्या योगदानासाठीचा पुरस्कार मिळाला. २०१६ साली ठाणे वैभवतर्फे 'उद्योग श्री गौरव' पुरस्कार तसेच चित्तपावन ब्राह्मण मंडळातर्फे 'यशस्वी उद्योगजगता' पुरस्कार व २०१८ साली ठाणे वैभव तर्फे 'उद्योग वैभव' पुरस्कार अशा औद्योगिक पुरस्कारांनी सन्मानित केले. श्री. विनय मराठे यांना शास्त्रीय संगीताची आवड असल्यामुळे त्यांनी ठाण्यातील रसिक प्रेक्षकांसाठी 'ऋतुरंग प्रतिष्ठान'ची स्थापना २००६ रोजी ठाणे येथे केली व आत्तापर्यंत अठरा दर्जेदार कार्यक्रम रसिकांपर्यंत पोहचवले.

श्री. काकासाहेब मराठे यांच्या म्हण्याप्रमाणे जोडलेली माणसे हीच कंपनीची खरी संपत्ती. याच उक्ती वरून Together We Grow हे कंपनीचे ब्रीद वाक्य आहे.

## श्री. मोहन सदाशिव मराठे (पृ. ३६५) यांना जीवन गौरव पुरस्कार




डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ही पूर्वीच्या मुंबई राज्यात (म्हणजे हल्लीचा महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक आंध्रप्रदेश गोवा हा प्रदेश) १९३६ साली स्थापन झाली. ही साखर उद्योगातील ऊस शेती, इंजीनियरिंग, केमिस्ट्री (टेक्नॉलॉजी), जोड पदार्थ व व्यवस्थापन ह्या क्षेत्रात काम करणाऱ्या तंत्रज्ञांची संस्था आहे तिची आजपर्यंत ६४ वार्षिक अधिवेशने झाली आहेत. ती संस्था ह्या क्षेत्रात काम केलेल्यांना जीवन गौरव पुरस्कार देते. साखर उद्योगातील कामाबद्दल व्यवस्थापन तज्ज्ञ (Management Expert) म्हणून जीवन गौरव पुरस्कार या वर्षी प्रतिष्ठानचे माजी कार्यवाह मोहनराव यांना शनिवार दि. २८ जुलै २०१८ रोजी गांधीनगर गुजरात येथील अधिवेशनात गुजरातचे उपमुख्यमंत्री श्री. नितिन भाई पटेल यांच्या शुभहस्ते गृहमंत्री श्री. जडेजा व सहकार मंत्री श्री. ईश्वरसिंग पटेल यांच्या उपस्थितीत दिला गेला.

मोहनरावांनी कार्यकारी संचालक Managing Director म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मुंबई येथे १७ वर्षे, व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ दिल्ली येथे १३ वर्षे अशी एकूण ३० वर्षे काम केले आहे. साखर संघात ऊस उत्पादकांसाठी काम केले असून जगातील साखर उद्योगाचा अभ्यास केला आहे. साखरेवर त्यांची ५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. मा. वसंतदादा पाटील ते मा. शरदराव पवार अनेकांचे मार्गदर्शन त्यांना प्रत्यक्ष लाभले. आपल्या या गौरवाचे ५०% श्रेय ते आपल्या पत्नीला तर उर्वरित या द्वायीला देतात.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. मोहनराव मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.

## शैक्षणिक पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची सूची - २०१८

| अनु | नाव | विद्यापीठ/मंडळ | परिक्षा | गुण | पैकी | टक्के | पारितोषिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रेश्मा अमोल मराठे | गोवा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | १० वी | ५६३ | ६०० | ९३.८३% | १००० |
| | | | कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक | | | | ५०० |
| | | | कै. माधुरी प्रमोद मराठे स्मृती पारितोषिक | | | | ४५० |
| २ | यश उदय मराठे | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | १० वी | ४४६ | ५०० | ८९.२०% | ८०० |
| ३ | पारिजात विश्वेश मराठे | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | १२ वी | ५७६ | ६५० | ८८.६२% | १००० |
| ४ | सानिका सुनील मराठे | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | १२ वी | ५४२ | ६५० | ८३.३८% | १००० |




## साभार पोच

**सुयरा** (मराठी कविता संग्रह)

**प्रकाशक** : आसावरी केळकर, श्यामसुंदर पब्लिकेशन्स, पुणे

**लेखिका** : संजीवनी राजाराम विलणकर, रत्नागिरी

**भ्रमणध्वनी** : ९४२१२३३६२४

**प्रथमावृत्ती** : २६ जानेवारी २०१७

**मूल्य** : रु. १५०/-

**BOOK POST**

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**

त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : hitguj@marathepratishthan.org • वेबसाईट : www.marathepratishthan.org